MAHMARI 19358/13/1/2000 - TC



विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष सोळावे / अंक ३ / मार्च २०१५

## संपादकीय

### शिक्षण, सामाजिक समरसता आणि ब्रेन ड्रेन

'नेमेचि येतो मग पावसाळा' या म्हणीप्रमाणे याही वर्षी जगातल्या सर्वोत्कृष्ट शंभर विद्यापीठांची नावे जाहीर झाली. अर्थातच भारताची ६०० विद्यापीठे किंवा ३५००० हून अधिक असलेल्या महाविद्यालयांमधील कोणाचाही क्रमांक त्यांमध्ये लागला नाही. गेली अनेक वर्षे हे असेच चालू आहे. या शंभरांमध्ये अमेरिकेतील चाळीसहून अधिक, इंग्लंडची दहा, जर्मनीची सहा आणि अगदी जपान, ऑस्ट्रेलिया आणि चीनमधील विद्यापीठांचाही समावेश आहे.

भारतामध्ये लोकशाही आहे; आणि राजकीय पक्ष आलटून पालटून सत्तेमध्ये असतात. सगळ्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देणे, शिक्षकांचे पगार, कुलगुरूंच्या नेमणुका शिवाय राजकीय नेत्यांच्या जयंत्या, सुटीचे आणि कामाचे दिवस इत्यादी 'राष्ट्रीय' कार्यक्रमांमध्ये केंद्र आणि राज्यांतले शिक्षणमंत्री व्यग्र असतात. शिवाय घटनेमधे आपण समाजवाद स्वीकारला असल्यामुळे; समाजामध्ये उच्चनीचतेचा भाव येऊ नये म्हणून आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना, परीक्षेसारख्या 'विषमते'ला खतपाणी घालणाऱ्या घातक रूढींना आपण शैक्षणिक प्रक्रियेतून हद्दपार केले आहे. पुढेही फार त्रास नको म्हणून सर्व स्पर्धात्मक परीक्षा सोप्या करण्यात, केंद्रिय आणि राज्यांतील शिक्षणमंत्री कार्यमग्न आहेत. शिवाय 'सामाजिक समरसता' आणि 'जातिनिर्मूलना'करता; पहिलीपासून 'जाती'वर आधारित प्रवेशाची 'क्रांतिकारक' योजना फक्त भारतामध्येच आपण राबवतो आहोत. हजारो वर्षांच्या अन्यायाला दूर करायला कमीतकमी तेवढीच वर्षे लागणे साहजिकच आहे. परदेशी विद्यापीठांना इतका व्यापक सामाजिक दृष्टिकोन नसल्यामुळे; ती 'मूठभर' लोकांनाच लाभ घेता येईल अशा 'संशोधन' किंवा 'दर्जा'सारख्या गोष्टींचा बाऊ करतात.

आर्थिक क्षेत्रामध्ये आपण स्पर्धेकरता लाजत-लाजत जागतिकीकरण स्वीकारले. शिक्षणक्षेत्रामध्ये मात्र भारतीय 'संस्कृती'चा चेहरा टिकविण्याकरता पाश्चात्त्य विद्यापीठांच्या भारतातील प्रवेशाला सर्व पक्षांचा विरोध आहे. भारताला जगातली विद्यापीठे नवीन काय शिकवणार? भारत हा एक प्राचीन देश आहे. आजच्या विज्ञानातले आणि पुढेही येणारे अनेक वैज्ञानिक शोध प्राचीन भारतीयांनी आधीच लावून ठेवल्याचे आपण ऐकतोच!! 'सांस्कृतिक'दृष्ट्या भारत 'बलाढ्य' करण्यावर सध्या आपला जास्त भर आहे. शाळा, महाविद्यालयांचा विकास सावकाश होऊ शकतो. पण आमचे सण,

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

आमचे गणपती, नवरात्र, दहीहंडी आणि आता गुढीपाडवा यांना गल्लीबोळापर्यंत पोहोचवण्याचे सांस्कृतिक कार्य सध्या महाराष्ट्रात अग्रक्रमाने चालू आहे. इतके लोक एकत्र येऊन जेव्हा नाचतात तेव्हा 'जातपात' नष्ट होऊन सामाजिक समरसतेचे शिक्षण आपल्याला त्यातून मिळते. शिवाय यामध्ये 'नारी' सबलीकरणाचाही मोठा प्रयत्न असतो. एके काळी ज्यांच्या पूर्वजांनी 'वेदपठण' किंवा 'वेदान्ता'वर चर्चा करण्यात वेळ 'फुकट' घलविला, त्यांच्या पुढील पिढ्या आता अशा सणांच्या वेळी नाचांच्या माध्यमातून 'लोकशिक्षणाचे' महान कार्य करीत आहेत. 'अभिरुची' अगदी समाजातल्या खालच्यात खालच्या थरापर्यंत पोहोचविण्याकरता; कंबर कसून, हालचालींना पाठीमागून सुरुवात करून, मग कोंबडी पळाली, मुन्नी बदनाम, ही पोळी साजूक तुपाशी अशी अनेक 'प्रतिभाशाली' गाणी कठीण शारीरिक प्रात्यक्षिकांद्वारे, 'समरसते'चा संदेश लोकांपर्यंत पोहोचविण्याचे महान काम त्या करीत असतात. शाहू, फुले, आंबेडकरांचा हा पुरोगामी महाराष्ट्र ह्यात आघाडीवर असला तर त्यात आश्चर्य ते काय? तेव्हा जगातल्या शंभर विद्यापीठांमध्ये स्थान मिळविण्याची घाई आतातरी करण्याची फारशी गरज नाही.

१९३९ साली जे. डी. बर्नाल (J.D.Bernal) यांनी राष्ट्राची आर्थिक गुंतवणूक आणि वैज्ञानिक प्रगती यांचा संबंध दाखवायाचा प्रयत्न प्रथम केला. याचा साधा अर्थ असा आहे की; शिक्षणामध्ये केलेली 'आर्थिक' गुंतवणूक ही शेवटी राष्ट्रीय हिताची असते. १९६७ साली आर्थिक उलाढालीमध्ये जगात भारत ९ व्या क्रमांकावर होता तर विज्ञान शिक्षणामध्ये भारताचा क्रमांक ८ वा होता. म्हणजे आपली राष्ट्रीय वैज्ञानिक संपत्ती ही आर्थिक गुंतवणुकीपेक्षा वरच्या श्रेणीवर होती. पन्नास वर्षांनी आज सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (GDP) तुलनेत; आर्थिक क्षेत्रात भारताचा क्रमांक ११ वा आहे. पण भारताची विज्ञानाच्या संदर्भातील 'संख्यात्मक' वाढ १६ व्या क्रमांकावर, तर 'गुणात्मक' वाढ २८ व्या क्रमांकावर आहे.

भारत आज एक आर्थिक महासत्ता होऊ पाहतो आहे. विज्ञान आणि औद्योगिकीकरणाशिवाय जगातला कुठलाच देश महासत्ता होऊ शकत नाही. अमेरिका हा जर आजची महासत्ता धरला; तर त्याच्या आर्थिक सबलीकरणात अमेरिकेतील विद्यापीठे आणि त्यांची ग्रंथालये यांचा सिंहाचा वाटा आहे. साहजिकच पहिल्या १०० विद्यापीठांमध्ये अमेरिकेची चाळीसहून अधिक विद्यापीठे असली तर त्यात नवल वाटायला नको. या विद्यापीठांमधूनच जगातली सर्वांत जास्त पेटंटस् निर्माण होतात, अनेक नवीन शोध लागतात आणि नवीन उद्योगधंद्यांमुळे नोकऱ्या नि व्यापाराला चालना मिळते.

२०११ मधील आकडेवारीनुसार भारताच्या सकल उत्पन्नाच्या (GDP) फक्त ०.९ टक्के खर्च हा संशोधनावर झाला. यातला फक्त ३० टक्के खर्च हा आपल्या उद्योगक्षेत्रातून होतो. या पार्श्वभूमीवर जपान हे चिमुकले राष्ट्रही आपल्या सकल उत्पन्नाच्या ३.६७ टक्के खर्च संशोधनावर करते आणि त्यातला ७५ टक्क्यांहून अधिक वाटा तेथील उद्योगसमूह उचलतात. अमेरिका, जर्मनी येथील परिस्थितीही जवळपास सारखीच आहे. भारताच्या अर्थसंकल्पामध्ये (Budget) सकल उत्पन्नाच्या ६ टक्के खर्च व्यापक शिक्षणावर होणे अपेक्षित आहे. गेल्या ६७ वर्षांत आपण तो ४ टक्क्यांपर्यंतही नेण्यात यशस्वी झालो नाही. यातलाही बराच खर्च हा पगारावरच होताना दिसतो. शिक्षकांचे पगार आणि विद्यार्थ्यांच्या फी माफीचे हजारो कोटी रुपये आजही केंद्र आणि राज्य सरकारकडून

(पृष्ठ क्र. ३९ वर)




व्ही.पी.एम्.

# दिशा

**वर्ष सोळावे / अंक ३ / मार्च २०१५**



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १९ वे/अंक ९वा)



**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**



**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | निंक्शिया प्रांतीय वस्तुसंग्रहालय | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | मूल्यवेध-३ : गती | श्री. नरेंद्र गोळे | ५ |
| ४) | 'माझ्या स्वप्नातील भारत' | श्री. प्र. द. अरदकर | ७ |
| ५) | वारसा संशोधनाचा | डॉ. सौ. अनघा गोखले | ९ |
| ६) | नर्मदा परिक्रमा (भाग : १३) | श्री. अरविंद ओक | १२ |
| ७) | भारताचे पूर्व व आग्नेय आशियाशी संबंध : एक दृष्टिक्षेप | साहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | १५ |
| ८) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १९ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २६ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# निंक्शिया प्रांतीय वस्तुसंग्रहालय

*चीनमधील यिंचुआन या शहरातील निंक्शिया प्रांतीय वस्तुसंग्रहालयाची माहिती देणारा लेख - संपादक*

यिंचुआन शहरातील वास्तव्यात अनेक ठिकाणांना भेटी देण्याचा योग आला. त्यांमध्ये समावेश होता प्रांतीय संग्रहालयाचा. यिंचुआन ही प्रांताची राजधानी असल्याने हे संग्रहालय याच शहरात आहे. आधीच्या काळात ते मंदीरवजा इमारतीत होते. इ.स. २००८ मध्ये या प्रांताला ५० वर्षे झाली म्हणून संग्रहालयाची नवीन इमारत बांधण्यात आली. २००८ पासून हे संग्रहालय आता प्रशस्त अशा चार मजली इमारतीत आहे. संग्रहालयाची केवळ इमारत प्रशस्त आहे असे नसून त्याच्या आजूबाजूचा परिसरदेखील प्रशस्त आहे. यिंचुआन शहरातील लोकांचा चौक (People's Sqare) तसा गजबजलेला भाग. या चौकाजवळच हे संग्रहालय उभारलेले आहे.




**संग्रहालय स्वागतकक्ष**

संग्रहालयात प्रवेश करताच फुलाफुलांनी सजविलेला एक भाग आपल्या नजरेस पडतो. त्याच्या सर्व बाजूंना वेगवेगळी दालने आहेत. एकीकडे वळून आपण आत गेलो की अश्मशिल्पाच्या दालनात शिरतो. जेथे अश्मशिल्पे मोठ्या प्रमाणावर आहेत असा हॅलेन डोंगर जवळच आहे. तेथील काही अश्मशिल्पांच्या प्रतिकृती येथे ठेवण्यात आलेल्या आहेत. मूळ खडकाची चांगली रचना करून अश्मशिल्पावर उजेड पडेल अशी व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे तेथील दृश्य मनोहारी असेच दिसते.



**एक अप्रतिम अश्मशिल्प**

भाषेचा विकास हा संस्कृतीच्या विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा समजला जातो. चिनी संस्कृती तशी जुनीच आहे. या संस्कृतीचा विकास वर्षानुवर्षे टप्प्याटप्प्याने झाला. त्यातील भाषाविकासाचे टप्पे दाखविणारे प्रदर्शन येथे भरविलेले आहे. भाषेला लेखनासाठी लिपीची गरज असते. सध्याची चिनी लिपी अनेक वर्षांच्या कालावधीत विकसित पावलेली आहे. त्यातील टप्पे दाखविणारे प्रदर्शनही आपल्याला येथे पाहायला मिळते.



**चिनी भाषेतील दस्तऐवज**

चीनच्या वेगवेगळ्या भागांत उत्खनन करून जुन्या काळात वापरण्यात येणाऱ्या वस्तूंचा शोध घेण्यात आला. त्यांतील काही धातूच्या वस्तू येथे प्रदर्शनात ठेवलेल्या

आहेत. चिनीमातीपासून बनविलेल्या वस्तू वर्षानुवर्षे टिकतात. त्यांवर नक्षीकाम आणि रंगकाम करता येते. ही कला चीनमध्ये फार प्राचीन काळापासून विकसित झालेली आहे. जगातील वेगवेगळ्या भागांत या भांड्यांचा वापर होतो. त्यांतील काही सुशोभित आणि सुंदर भांडी एका दालनात ठेवलेली आहेत. चीनमध्ये बुद्ध धर्माचा प्रसार काही शेकडो वर्षांपूर्वी झाला. बौद्ध भिक्षूंनी या धर्माचा प्रसार केला. त्यासाठी त्यांनी गौतम बुद्धीला देवस्थानी ठेवले. त्यामुळे गौतम बुद्धाच्या मूर्ती असलेली अनेक मंदिरे या परिसरात निर्माण झाली. त्यातील काही मूर्ती प्रदर्शनात ठेवलेल्या आहेत. गौतम बुध्दाची धातूची शांत, गंभीर मूर्ती आपले लक्ष निश्चितच वेधून घेते.



**बुद्धाची धातूची मूर्ती**

निंक्शिया प्रांतात मुस्लीम लोक मोठ्या संख्येने आहेत. म्हणूनच या प्रांताला निंक्शिया हुई स्वायत विभाग असे नाव दिलेले आहे. त्यामुळे साहजिकच या धर्मातील लोकत्यांच्या चालीरिती यासाठी एक वेगळे दालन निर्माण केलेले आहे. मुस्लीम धर्माच्या स्थापनेपासून तर आजतागायत या धर्मात झालेले बदल नोंदविण्याचा प्रयत्न केलेला आहे. मुस्लीम समाजातील लोकांची घरे कशी असतात, त्यांच्यात विवाह कसे होतात, हे लोक सण कसे साजरे करतात या सगळ्यांची माहिती आपल्याला या दालनात मिळते. मंगोलियन सैनिकांकडून पराभूत होईपर्यंत शीशिया राजाची सत्ता या भागात होती. त्या राजवटीची माहिती देणारे एक दालन येथे आढळते. त्या काळात वापरण्यात येणाऱ्या वस्तूंचे प्रदर्शन भरविलेले आहे. त्याचबरोबर शीशिया दफनभूमीतील उत्खननात आढळलेल्या काही वस्तू येथे ठेवलेल्या आहेत.



**उर्दू भाषेतील शिलालेख**

वस्तुसंग्रहालयाच्या इमारतीचे बांधकाम वैशिष्ट्यपूर्ण असेच आहे. चारही बाजूला प्रदर्शनाची दालने आणि मधला भाग मोकळा अशी व्यवस्था आहे. सूर्यप्रकाशाच्या येथे शिताफीने उपयोग करून घेतलेला आहे. इमारतीच्या मध्यभागी असलेले छत सूर्यप्रकाश आत येऊ देते. त्यामुळे आतला भाग उजळून जातो. मध्यभागी तळमजल्यावर एक स्टेज बांधलेले असून एखादा लहानसा कार्यक्रम करायचा असेल तर येथे त्याची सोय होते. दालनातील वस्तू पद्धतशीर लावलेल्या असून त्यांवर पुरेसा प्रकाश पडेल अशी व्यवस्था केलेली आहे. दालनात प्रवेश करण्याचा आणि बाहेर पडण्याचा मार्ग वेगवेगळा असल्याने कितीही गर्दी झाली तरी गैरसोय होत नाही.



**संग्रहालयाची भव्यता**

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभव नगरी,
काटई, ता. कल्याण,
जि. ठाणे - ४२१२०४

# मूल्यवेध-३ : गती

*मानवाच्या जीवनात गतीला किती महत्त्व असते हे विशद करणारा लेख - संपादक*

अन्न, वस्त्र, निवारा किंवा ''आहार निद्रा भय मैथुनंच'' इतक्याच काय त्या जीवनाच्या मूलभूत गरजा असतात, असा आपला समज असतो. तसा तो सततच करून दिला जात असतो. मात्र हे खरे नाही. जीवनाला आवश्यकता असते ती गतीची. ह्याची जाणीवही आपल्याला क्वचितच करून दिली जात असते.

काळाची गती अपरंपार असते. काळासारखी गतिमान वस्तू जगात दुसरी कुठलीही नसेल. मनुष्य कालवश होतो. मग आपण सांत्वन करत असतो, की ईश्वर मृतात्म्यास सद्गती देवो. म्हणजेच गतीला आपण हवीशी मानत असतो. मनुष्याच्या पूर्वसुकृतानुरूप चांगली वा वाईट गती त्यास प्राप्त होतच असते. मात्र गतीविरहित जीवनाची कल्पनाच करता येत नाही.

सर्व चराचर सृष्टी सततच बदलत असते. चर म्हणजे हलत्या, सजीव वस्तू. अचर म्हणजे रूढार्थाने अचल, स्थिर, निर्जीव वस्तू. मात्र सृष्टीच्या अनेकविध घडामोडींत, त्याही सतत आपली जागा बदलताना दिसून येतात. सृष्टीचे जलचक्र, जलराशींची उठाठेव करत असते. समुद्रावरून पर्वतांवर आणि उंचीवरून गुरुत्वाने खाली वाहत, पुन्हा समुद्रांपर्यंत; जलराशी अव्याहत प्रवास करत असतात. कधी संथ तर कधी जलद. मात्र गतिहीन झाल्यास पाणी सजीवांकरता धार्जिणे राहत नाही. पाणी तुंबले तर तळ्याला डबके म्हणतात. वाऱ्याच्या लहरींवर सरकत, थिरकत राहते, ते सर. सरोवर. त्या प्रवाहाने वाहत जाते ती सरिता. नदी. नदी हे गतीचे प्रतीक आहे. नदीला जीवनदायिनी मानतात. माता समजतात. म्हणजे खरेतर गतीलाच माता मानत असतात. आदिशंकराचार्यांचे भवानिअष्टकम् तर ह्या संकल्पनेवरच आधारित आहे. त्यात ते म्हणतात : ''गतिस्त्वं गतिस्त्वं त्वमेका भवानि.'' म्हणजे हे भवानी, आमची सर्व स्वरूपाची गती तुझ्यामुळेच प्राप्त झालेली आहे. त्या गतीचा आधार तूच आहेस. किंबहुना तू स्वतःच गतिस्वरूप आहेस. गती आहेस.

उन्हाळा बहरात असतो. ग्रीष्मातले ऊन मी म्हणत असते. झाडाचे एक पानही हलत नसते. वारा पडलेला असतो. अशा वेळी साधेसे तापमानही सजीवाला कष्टदायक वाटू लागते. कुठलेही अवजड काम न करताही, घामाच्या धारा वाहू लागतात. हवा असलेला प्राणवायू आसपासच विहरत असतो. मात्र वाऱ्याची झुळूकही न आल्याने, सजीवाशेजारची अपानमिश्रित, उष्ण हवा त्याला तशीच वेढून राहते. जीव नकोसा होऊन जातो अगदी. मग पंखे लावून आपण हवेला, हवी ती गती देतो. वातावरण त्यामुळे कृत्रिमरीत्या सुसह्य होऊ लागते. अशाच वेळी मग हलकेच कुठूनशी मंद वाऱ्याची झुळूक येते. अगदी स्वाभाविकपणे. तो सुखद गारवा हवाहवासा वाटू लागतो. कारण त्यामुळे सभोवतालच्या हवेला गती प्राप्त होऊन, तिची जागा ताजी, थंड हवा घेत असते. असे आहे गतीचे माहात्म्य.

गतीने गुंफला वारा, हवा वाटे, समीर सारा।
न हले पर्णही जेव्हा, नको वाटे, कहर सारा॥

अरवली पर्वताचे सर्वोच्च शिखर माउंट अबूला आहे. त्याचे नाव गुरुशिखर. गुरुशिखरावर वाहणाऱ्या वाऱ्याचे वर्णन गोरखनाथांनी खालीलप्रमाणे केले आहे,

पवनही भोग, पवनही योग। पवनही हरे छत्तीसो रोग॥

म्हणजे वाराच भोग देतो, वाराच योग होतो, सर्व रोगांचे निवारणही वाराच करत असतो. मात्र वारा म्हणजे काय तर गती प्राप्त झालेली हवा. किंबहुना गतीच.

''ऋषिमुनींना सुटेना असा भुकेचा उखाणा'' असे एक गाणेच पूर्वी ऐकल्याचे मला आठवते. मनुष्याला भूक लागते. मग तिच्या शमनार्थ तो जी काही कर्मे करतो, त्यांतच तो गुंतत जातो. उपजीविकाच मनुष्याला गती देत असते. ती असते अपरिहार्य गती. स्वाभाविक गती. पण मनुष्य मनुष्य असतो. तो अंतर्प्रेरणेनेही भारलेला असतो. त्या प्रेरणांमुळे तो जी गती प्राप्त करत असतो, ती स्वाभाविक उपजीविकेच्या प्रेरणेहूनही असामान्य असू शकते. गतिमान असू शकते. लोकनेत्यांना वास्तविक उपजीविकेपाठी गतिमान होण्याची आवश्यकताच नसते. मात्र आपणां सगळ्यांपेक्षा तेच सर्वात अधिक सक्रिय असलेले दिसून येतात. दिवसाचे सोळा-सोळा तास केवळ अंतर्प्रेरणेमुळे कार्यरत असतात. स्वयंप्रेरणेच्या अपार गतीने, मानवी संस्कृती झपाट्याने प्रगतिपथावर अग्रेसर होत असते.

जे उपजीविकेचीही पर्वा करत नाहीत, ते प्राणी आळशी होत जातात. सृष्टिचक्रात ते टिकाव धरू शकत नाहीत. मनुष्यांत मात्र अशा आळशांना इतर अतिसक्रिय निकटवर्ती लाडाने, प्रेमाने भरवत राहतात असे दिसून येते. तरीही, मानवी संस्कृतींतूनही आळसास निंद्यच मानले गेले आहे. पंचतंत्रातील खालील श्लोक ह्याचीच ग्वाही देत असतो.

षड्‌ दोषा: पुरुषेणेह हातव्या भूतिमिच्छता।
निद्रा तन्द्रा भयं क्रोध: आलस्यं दीर्घसूत्रता॥ - पंचतंत्र

पंचतंत्रात झोप, तंद्री लागणे, भीती, आळस आणि वर्तनमंदता हे सहा दोष मानले गेलेले आहेत. मनुष्याने त्यांपासून दूरच राहावे अशी शिकवणही पंचतंत्रातून प्राप्त होत असते. जगात वागावे कसे ह्या प्रश्नाचे उत्तर अनेक लोक आपापल्या दृष्टीनुरूप निरनिराळे देतीलही, मात्र जगात गतिप्रगत होत असावे, तल्लख वागणुकीतून अभिव्यक्त व्हावे अशी त्यांचीही अपेक्षा असतेच.

मानवी शरीरात तर अन्नापासून ऊर्जा आणि ऊर्जेपासून उपजीविकेकरताची हालचाल साधली जात असते. ह्याकरता प्रथमतः रासायनिक, मग यांत्रिक आणि अंतिमतः वैचारिक उलाढाली आकारास येत असतात. त्यांना जैवविज्ञानात चयापचय म्हणतात. चयापचय म्हणजे निरंतर होत असणारी हालचाल. गतिमानता. त्यासाठी प्राण-अपान वायू रक्तातून सारखे फिरवले जात असतात. त्याकरता मिनिटाला ७२[१] ठोके दराने, जन्मापासून तर मरणापर्यंत ६०, ७०, ... १०० वर्षे हृदय, सतत स्पंदत असते. न कुरकुरता. तुम्ही कदाचित असेही म्हणाल की, त्यात काय एवढे? आम्ही हवे तेव्हा ते थांबवून दाखवू. मात्र तसे करणे सजीवास शास्त्रीयदृष्ट्या शक्यच नसते. अगदी श्वासोच्छ्वासाची गतीही आपण फारशी नियंत्रित करू शकत नाही. थांबवूही शकत नाही.[२] काहीशी नियंत्रणात आणू शकतो. तशी आणतो, तेव्हा त्यास प्राणायाम करणे म्हणतात.

दररोज किमान १०,००० पावले चालत राहिल्यास म्हातारपणी संधिवाताचा त्रास होत नाही असा सल्ला डॉक्टर देतात. म्हणूनच पदभ्रमण करणारे आरोग्यपूर्ण जीवन जगताना दिसतात. पदभ्रमणकर्त्यांचे एक बोधवाक्य आहे ''चरन्‌ वै मधु विन्दन्ति.'' म्हणजे सतत फिरत राहूनच मधमाशा मध गोळा करू शकत असतात. तसे सदैव फिरते राहा. मधुरता मिळवू शकाल. आरोग्य मिळवू शकाल.

गतीची आराधना ही भारतीयांची संस्कृती आहे. ज्योतिर्मय जीवन ही आपली धारणा आहे. ती साजरी करण्याकरता नदीत दीपदान केले जाते. गंगा नदीवर हरिद्वारमधील हर-की-पौडी येथे गेल्या हजारो वर्षांपासून दररोज संध्यासमयी पानांच्या द्रोणांत वाती पेटवून, ते दिवे

(पृष्ठ क्र. ११ वर)

# ‘माझ्या स्वप्नातील भारत’

*स्वप्नातील भारत कसा असेल याचे वर्णन लेखकाने या लेखात केले आहे - संपादक*

माणसाच्या अनेक व्याख्या करण्यात आलेल्या आहेत. ‘ज्याला स्वप्ने पडतात आणि जो स्वप्ने पाहतो तो माणूस’ अशीही माणसाची व्याख्या करता येईल. मलादेखील स्वप्ने पडतात आणि मीदेखील स्वप्ने पाहतो. त्यांपैकी काही वैयक्तिक असतात तर काही देशाविषयीदेखील असतात. ह्यांना दिवास्वप्ने किंवा मनोराज्य असेही म्हणता येईल. ‘माझ्या स्वप्नातील भारत’ कसा असेल, ह्याचे चित्र आपल्यापुढे थोडक्यात रेखाटण्याचा प्रयत्न मी ह्या लेखात करणार आहे.

आपल्या देशामध्ये ‘लोकसंख्येचा स्फोट’ झालेला आहे, असे आपण म्हणतो. आणखी काही वर्षांनी चीनला मागे टाकून लोकसंख्येमध्ये आपला जगात पहिला क्रमांक असेल. लोकसंख्यावाढीचे दुष्परिणाम असे आहेत की, शासनाने देशाच्या हिताच्या आणि जनतेच्या विकासाच्या कितीही योजना राबविल्या, तरी त्यांचे परिणाम आपल्याला अनुभवायला मिळत नाहीत. त्यामुळे देशाचा विकास झालेला दिसत नाही. माझ्या स्वप्नातल्या भारतामध्ये लोकसंख्या नियंत्रणात असेल. ‘हम दो, हमारा एक’ हे धोरण राबविले जाईल. लोक स्वखुशीने कुटुंबनियोजन करतील आणि त्यातून ‘कुटुंबकल्याण’ साधेल. लोकसंख्या नियंत्रणात आल्यामुळे कल्याणकारी योजनांची फळे जनतेला चाखायला मिळतील आणि सर्वच क्षेत्रांमध्ये आपल्याला देश प्रगतिपथावर असल्याचे दिसेल आणि देश ‘महासत्ता’ बनण्याचे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम ह्यांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरेल.

सध्या महागाई गगनाला भिडलेली आहे. महागाईवर सरकारचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही. त्यामुळे गरिबांचे जिणे मुश्कील झाले आहे. त्यांना दोन वेळच्या जेवणाची भ्रांत आहे. माझ्या स्वप्नातील भारतामध्ये उत्पादक आणि उपभोक्ता ह्यांमध्ये प्रत्यक्ष संबंध स्थापित झालेले असतील. मधले दलाल, अडते असणार नाहीत. त्यामुळे महागाई आटोक्यात आलेली असेल. महागाईवर शासनाचे नियंत्रण असेल. त्यामुळे गरिबांना जिणे सुसह्य होईल. दुसरी गोष्ट म्हणजे, आपल्या देशामध्ये भ्रष्टाचार हा शिष्टाचार झालेला आहे. लाच देणारा आणि लाच घेणारा दोघांनाही त्याचे काही वाटत नाही. आपल्या देशामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण फारच वाढलेले आहे. कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती फारच खालावलेली आहे. पोलीस, कायदा आणि न्यायव्यवस्था ह्यांचा धाक, भीती गुन्हेगारांना उरलेली नाही. त्यामुळे हुंडाबळी, बलात्कार, अपहरण, महिलांवरील अत्याचार चोऱ्या, दरोडे ह्यांचे प्रमाण बेसुमार वाढलेले आहे. माझ्या स्वप्नातील भारतामध्ये कायद्याचे राज्य असेल. गुन्हेगारांना कठोर शासन असेल. त्यामुळे गुन्हेगार गुन्हा करायला धजावणार नाहीत. साहजिकच सामाजिक नीतिमत्ता सुधारण्यास मदत होईल.

आपल्या देशाचा दुसरा शत्रू म्हणजे अंधश्रद्धा. आपल्या देशाने वैज्ञानिक प्रगती केलेली असली तरी खऱ्या अर्थाने बुद्धिप्रामाण्यवाद किंवा विज्ञाननिष्ठा आपल्या समाजामध्ये रुजलेली नाही. त्यामुळे एखादी व्यक्ती आजारी पडली असता डॉक्टरकडे न जाता भगताकडे किंवा मांत्रिकाकडे जाण्याचे प्रमाण अजूनही बरेच आहे. अंधश्रद्धानिर्मूलनाचे कार्य करीत असल्यामुळेच डॉ. नरेंद्र दाभोलकरांचा खून झालेला आहे. त्यांचे मारेकरी अद्याप

सापडलेले नाहीत, ही खेदाची बाब आहे. माझ्या स्वप्नातील भारतामध्ये अंधश्रद्धेचे समूळ निर्मूलन झालेले असेल. समाज खऱ्या अर्थाने विज्ञाननिष्ठ आणि सश्रद्ध झालेला असेल.

आपला आणखी एक शत्रू म्हणजे भेदभाव. प्रांतभेद, भाषाभेद, पंथभेद, जातिभेद असे आपल्या देशामध्ये कितीतरी प्रकारचे भेदभाव आहेत. त्यामुळे आपल्या समाजाची हानी झालेली आहे आणि आपल्या देशाच्या विकासाला खीळ बसलेली आहे. शिवाय स्त्री-पुरुष भेद हा तर समाजाच्या सर्व थरांमध्ये असणारा भेदभाव आहे. माझ्या स्वप्नातील भारतामध्ये कोणत्याही प्रकारच्या भेदभावांना थारा असणार नाही. देशामध्ये सर्वधर्मसमभाव, परधर्मसहिष्णुता असेल. देश खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष असेल. स्त्रीभ्रूणहत्या थांबलेल्या असतील आणि स्त्रियांना समानतेने व सन्मानाने वागविले जाईल.

आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ६० वर्षे होऊन गेली तरी आपल्या देशातील बरीचशी जनता दारिद्र्यरेषेखालील जिणे जगत आहे. त्यांना दोन वेळच्या जेवणाची भ्रांत आहे. कारण आपल्याकडे आर्थिक विषमता आहे. मूठभर श्रीमंत अधिकाधिक श्रीमंत होत आहेत आणि गरीब अधिकाधिक गरीब होत आहेत. देशामध्ये सुशिक्षित आणि अशिक्षित दोन्ही प्रकारची बेकारी आहे. शेतजमिनीची विभागणी असमान आहे. भमिहीन शेतमजुरांची संख्या जास्त आहे. माझ्या स्वप्नातील भारतामध्ये प्रत्येक हाताला काम असेल. उद्योगधंदे, कारखाने, व्यवसाय वाढलेले असतील. सिंचनाच्या पुरेशा सोयी उपलब्ध झाल्यामुळे शेतीविकास झालेला असेल. त्यामुळे देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण असेल आणि देश खऱ्या अर्थाने 'सुजलाम्, सुफलाम्, मलयज शीतलाम्' झालेला असेल. आपल्या देशामध्ये अजूनही दळणवळणाच्या पुरेशा सोयी नाहीत. काही दुर्गम भागांतील गावे रस्त्याने जोडलेली नाहीत. काही गावे वीज नसल्यामुळे अजूनही अंधारात आहेत. ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. शहरामध्ये पाण्याची लयलूट चाललेली असताना ग्रामीण भागामध्ये महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी मैलोन्मैल पायपीट करावी लागत आहे. टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. माझ्या स्वप्नातील भारतामध्ये हे चित्र पालटलेले असेल.

अजूनही आपल्याकडे शिक्षणाचा प्रसार व्हावा तेवढा झालेला नाही. ग्रामीण भागात तसेच शहरांमध्ये झोपडपट्टी विभागात शिक्षणाच्या पुरेशा सोयी उपलब्ध नाहीत. प्राथमिक शिक्षणाकडे (जो मूळचा घटनेने दिलेला हक्क आहे) दुर्लक्ष झालेले आहे. स्त्रियांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. माझ्या स्वप्नातील भारतामध्ये कोणीही अक्षरशत्रू राहणार नाही. सर्व जण सुशिक्षित आणि खऱ्या अर्थाने सुसंस्कृत असतील. आपल्याकडे वैद्यकीय सोयी-सुविधादेखील अपुऱ्या आहेत. अजूनही बालमृत्यूचे प्रमाण जास्त आहे. मेळघाटासारख्या भागामध्ये कुपोषण भयावह आहे. प्राथमिक आरोग्यकेंद्रांची दुरवस्था झालेली आहे. माझ्या स्वप्नातील भारतामध्ये अन्न, वस्त्र, निवारा ह्या मूलभूत गरजांबरोबर शिक्षण आणि आरोग्य ह्या मूलभूत गरजांची पूर्तता केली जाईल.

आपल्या देशामध्ये स्वच्छतेचा अभाव आहे. आपली वैयक्तिक्र स्वच्छता कितीही चांगली असली तरी, सार्वजनिक स्वच्छतेची आपल्याला जाणीवदेखील नाही. माझ्या स्वप्नातील भारतामध्ये हे चित्र पालटलेले असेल. आपले पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजी ह्यांचे स्वच्छ भारताचे स्वप्न साकार झालेले असेल. दुसरे म्हणजे आपल्याकडे सामाजिक शिस्तीची वानवा आहे. त्यामुळे रस्त्यावरील अपघात, यात्रेच्या ठिकाणी चेंगराचेंगरी इ. प्रकार होतात. माझया स्वप्नातील भारतामध्ये स्वयंशिस्त असेल.

आपला देश क्रीडाक्षेत्रामध्ये मागासलेला आहे. एवढ्या मोठ्या खंडप्राय देशाला ऑलिपिंकमध्ये एका हाताच्या बोटांवर मोजता येतील इतकीही पदके मिळवता येत नाहीत. माझ्या स्वप्नातील भारतामध्ये क्रीडासंस्कृती

(पृष्ठ क्र. ३ वर)

# वारसा संशोधनाचा

*संशोधनाचे महत्त्व लेखकाने चांगल्या तऱ्हेने विशद केलेले आहे- संपादक*

भारतीय संस्कृती महान आहे याबाबत कुणाचेच दुमत नाही. ज्या भारतीय संस्कृतीचा आपण डांगोरा पिटतो, आणि आज वैज्ञानिक जगामध्ये जे नवनवीन शोध लागले आहेत किंवा लागत आहेत ते आमच्या पूर्वजांनी कसे आधीच लावले आहेत यासाठी पुराणातले दाखले देतो ती गुणसूत्रे, जी आमच्या पूर्वजांकडून आमच्याकडे यायला हवीत ती गेली कुठे? आमची जिज्ञासा का कमी कमी होत गेली? आमच्यातील विवेचनात्मक विचार करण्याची वृत्ती कुठे गेली? वेगळा विचार करण्याचे कौशल्य आम्ही कुठे हरवून बसलोय का? प्रयोग करून बघण्याची आम्हांला भीती का वाटते? एकूणच जागतिक आकडेवारीत भारत संशोधनात मागे का? या सगळ्याचे उत्तर कोणी एका शब्दात देईल- गरिबी, कोणी दोन शब्दांत देईल-वाईट पालकत्व तर कोणी तीन शब्दांत देईल - आजची शिक्षणप्रणाली. पण उत्तर देणाऱ्याने उत्तर देताना याचा कधी खोलात जाऊन विचार केलेला असतो का? तर याचेही उत्तर बऱ्याचदा नाही असेच असते. एकंदरीतच समस्येच्या मुळापर्यंत न जाता वरवरची मते मांडण्यातच आम्ही धन्यता मानतो आणि तिथेच आमचे संशोधन हरते.

आपल्याला आपल्या संस्कृतीचा अभिमान असणे गैर नाही. पण मराठीत एक म्हण आहे, 'काप गेले नि भोके राहिली.' म्हणजे पूर्वीचे वैभव गेले नि फक्त खुणा राहिल्या. आजही अनेक घरांतून पूर्वी आमच्याकडे कसे वैभव होते, आमचे पूर्वज कसे कर्तृत्ववान होते याच्या गाथा गायच्या आणि त्यांच्या पुण्याईवर जगायचे असे सर्रास दिसते. हे व्यक्तीच्या बाबतीत जितके खरे तितकेच देशाच्या बाबतीतही खरे. किती दिवस आम्ही देशाच्या महान परंपरेचे नुसते गोडवे गात बसणार?

अर्थात याचा अर्थ असा नव्हे की प्रत्येक भारतीयाने संशोधन करून संशोधनप्रबंध लिहावेत. पण किमान आपल्या मेंदूला प्रश्न न विचारण्याची, वेगळा विचार न करण्याची जी सवय लागली आहे ती तरी हळूहळू मोडायला हवी. प्रत्येक वेळी दुसऱ्याने माझा विचार करावा, माझ्यासाठी काही करावेही अवलंबित्वाची प्रवृत्तीही कमी व्हायला हवी. त्यासाठी प्रथम संशोधन म्हणजे काय? संशोधनाशी साधर्म्य दाखविणाऱ्या अनेक संकल्पना आहेत त्यांत आणि संशोधनात फरक काय? संशोधनासंबंधी समाजाची मानसिकता कशी असते? संशोधनासाठी अनुकूल घटक कोणते या सर्वांसंबंधी जाणून घेऊ.

रामदासस्वामी म्हणतात त्याप्रमाणे 'दृष्टिस लागली सवे। जे दिसेल तेंचि पाहावे। परंतु गुज तें जाणावें। गोप्य आहे ।।' पुढे ते असेही म्हणतात, 'जे दिसते त्याच्या पलीकडे जाऊन जे दिसत नाही ते अभ्यासाने आणि विवेकाने जाणून घ्यावे.' हीच जर संशोधनाची कसोटी म्हणून लावली तर जिज्ञासा, चौकटीबाहेरचा विचार, कल्पकता, नवोन्मेष आणि नवीन शोध या थोड्याफार सारख्याच अर्थाने वापरल्या जाणाऱ्या संकल्पना आणि संशोधन यांच्यात फरक काय?

जिज्ञासा हा माणसाचा स्वभाव आहे. विज्ञानाचे अनेक शोध या जिज्ञासेतूनच लागले आहेत आणि ते सामान्य माणसांनीच लावले आहेत. चौकटीबाहेरचा विचार आणि कल्पकता यांच्या पारिभाषिक अर्थाची सीमारेषा फारच धूसर आहे. तरीही एक नक्की,

चौकटीबाहेरचा विचार हा अतार्किक आणि असाधारण असतो. उदा. विश्वात अजून एक अशीच पृथ्वी असेल, त्यावर मानव असतील, ते आपल्यापेक्षा पुढारलेले असतील इ. म्हणजे हे केवळ कल्पित असते. तर कल्पकता हा कल्पनाशक्तीचा आविष्कार असतो ज्यात कल्पना प्रत्यक्षात आणली जाते. उदा. वाद्यातून नवीन सुरावटी काढणे, चित्रकलेत प्रतिमांचे वेगळ्या अर्थाने उपयोजन करणे इ. नवीन शोध म्हणजे मूलभूत शोध, पण पूर्णपणे नवे असे काही शोधायचे राहिलेय असे शास्त्रज्ञांना वाटत नाही. आता जे शोध लागतात ते नवोन्मेष आहेत म्हणजे विज्ञानाच्या नियमांचे नावीन्यपूर्ण पद्धतीने केलेले आविष्करण होय. संशोधनाचे स्वरूप हे या सर्वांपेक्षा भिन्न आहे. संशोधन हे शास्त्रीय आणि वस्तुनिष्ठ पद्धतीने केले जाते. समस्येचा सांगोपांग अभ्यास करून तिच्या मुळापर्यंत जाऊन त्या समस्येवर योग्य तो तोडगा काढणे म्हणजे संशोधन. पण प्रत्येक संशोधन समस्येवर तोडगा काढण्यासाठीच असेल असेही नाही.

आधुनिक संशोधनाचे टप्पे ठरलेले आहेत. सर्वप्रथम समस्येची मांडणी, नंतर त्याच्या संदर्भातील संकल्पनांचा अभ्यास, पूर्वसुरींनी केलेल्या संशोधनाचा अभ्यास, गृहीतके मांडणे, संशोधन आराखडा बनविणे, या आराखड्यात संशोधनाची पद्धती, नमुने किती, कुठले आणि त्यांचा अभ्यास कशापद्धतीने करणार, माहितीचे स्रोत, माहितीचे पृथक्करण कसे करणार, संशोधन अहवालाची रचना, अपेक्षित अंतिम परिणाम, आर्थिक घटक, संशोधन कालावधी इ. गोष्टी समाविष्ट असतात. यानंतर खऱ्या अर्थाने संशोधन आराखड्याची अंमलबजावणी सुरू होते. प्रत्येक वेळी संशोधनातून आपल्याला अपेक्षित परिणामच मिळतील असे नाही. काही अनपेक्षित असेही परिणाम येऊ शकतात. संशोधनाच्या शेवटी निष्कर्ष आणि उपाययोजना सांगितलेल्या असतात ते संशोधनाचे फलित असते.

आपल्या पूर्वजांना संशोधनाची ही शास्त्रीय आणि वस्तुनिष्ठ पद्धती माहीत असावी. वि.दा.सावरकर 'सनातन धर्म' या लेखात म्हणतात त्याप्रमाणे, वेद म्हणजे जीवनाशी निगडित असलेल्या प्रत्येक विषयाचे ज्ञान असावे. हे ज्ञान चार वेद, सहा वेदांगे व चार उपांगे यांत समाविष्ट आहे. यात विविध शास्त्रांचा अभ्यास केला गेला आहे, जसे की भाषाशास्त्र, कृषिशास्त्र, ज्योतिषशास्त्र, खगोलशास्त्र, आयुर्वेद, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, जीवशास्त्र, गणितशास्त्र, भूशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, धातुशास्त्र, स्थापत्यशास्त्र, वास्तुशास्त्र, शिल्पशास्त्र, मानवशास्त्र, नीतिशास्त्र, न्यायशास्त्र, योगशास्त्र इ. अर्थात हे संशोधनाशिवाय शक्य नाही.

आपले पूर्वज इतक्या ज्ञानशाखा कसे विकसित करू शकले? त्याची कारणे त्या काळच्या समाजव्यवस्थेत दडलेली आहेत. त्या काळचा समाज आत्मनिर्भर होता. व्यापारउदीम उत्तम होता. एकूणच देशात सुबत्ता होती. कलांना आणि ज्ञानाला राजाश्रय होता. समाजात धनापेक्षा ज्ञानाला किंमत होती. तक्षशीला, नालंदासारख्या विद्यापीठांत शिक्षण घेण्यासाठी परदेशी विद्वान येत असत. त्या काळी एकूणच सामाजिक, आर्थिक आणि राजकीय वातावरण संशोधनाला पोषक होते.

अनेक वर्षांच्या गुलामगिरीने दीर्घकालीन दृष्टी, कठोर मेहनत, धैर्य आणि आपल्या तत्त्वांवर ठाम राहण्याची वृत्ती आपण गमावून बसलो आहोत आणि हेच खरे समस्येचे मूळ आहे. दुर्दैवाने स्वातंत्र्योत्तर भारतात सुशासनाचा अर्थ लोकांना कठोर मेहनत न करता सगळे काही मिळाले पाहिजे असा लावला गेल्याने आणि विनासायास सगळे मिळत गेल्याने समाजात शैथिल्य आले. वेगळा विचार करण्याची आपली प्रज्ञा खुंटून गेली. नवीन प्रयोग करण्याचे धाडस आपण गमावून बसलो. आपल्या वैचारिक भूमिकेत सुस्पष्टता नसल्याने निर्णयशक्ती विकसित झाली नाही. त्यामुळे संशोधनच काय, इतर

क्षेत्रांतही आपण फार मोठी छाप पाडू शकलेलो नाही. स्वावलंबी समाज हेच अनेक प्रश्नांवर उत्तर असू शकेल. त्यासाठी आवश्यकता आहे ती परंपरेतील कर्मसिद्धान्ताची कास धरून विज्ञान कवेत घेऊन न उलगडलेल्या रहस्यांचा शोध घेण्याची.

त्यासाठी दिसण्यातला आणि बघण्यातला फरक ओळखायला हवा. जे नजरेला दिसते ते आपल्याला दिसते. पण जे नजरेला दिसते त्यापलीकडचे बघण्यासाठी वेगळी दृष्टी लागते ती म्हणजे संशोधनाची. माणसांचे चार प्रकार असतात. पहिल्या प्रकारातील माणसे समस्या आली की तिच्यापासून पळ काढतात. दुसऱ्या प्रकारातील माणसे दुसरा कोणीतरी माझ्यासाठी काहीतरी करेल म्हणून वाट बघत बसतात. तिसऱ्या प्रकारातील माणसे समस्या सोडविण्याच्या दृष्टीने दृश्य कारणांवर उपाययोजना करतात. तर चौथ्या प्रकारातील माणसे ही नुसती दृश्य कारणांवर उपाययोजना करून थांबत नाहीत तर त्यांवर संशोधन करतात. समस्येच्या अदृश्य कारणांचा वेध घेतात, त्यांचा उगम शोधतात आणि ती कारणे समूळ नष्ट कशी करता येतील याचा विचार करून काही उपाययोजना करतात. सध्या बहुतांशी माणसे पहिल्या तीन प्रकारांत मोडतात, आणि फारच थोडी चौथ्या प्रकारात येतात. आपण या चौथ्या प्रकारातील माणूस बनणे आवश्यक आहे. अर्थात हे ‘जादूच्या कांडी’ सारखे झटपट होणार नाही. आपल्या पूर्वजांचा संशोधनाचा वारसा जपण्यासाठी आणि पुढील पिढीत संक्रमित करण्यासाठी सुरुवात तर आपल्यापासूनच करावी लागेल ना?

**डॉ. सौ. अनघा गोखले**
वि. प्र. मं. चे महर्षी परशुराम अभियांत्रिकी
महाविद्यालय, वेळणेश्वर.
e-mail : anagha.gokhale@vpmmpcoe.org
भ्रमणध्वनी-९८५०८९०३८२

●●●

(पृष्ठ क्र. ६ वरून **मूल्यवेध-३ : गती**)

गंगेत सोडून दिले जातात. त्या ज्योतीस प्राप्त होते तशीच गती आमच्या जीवनांनाही प्राप्त होवो अशी प्रार्थनाही दररोज लाखो लोक करत असतात. विख्यात समाजसेवक आणि कविवर्य बाबा आमटे, ‘गतीचे गीत’ ह्या आपल्या अजरामर कवितेत असे म्हणतात की :

शृंखला पायी असू दे, मी गतीचे गीत गाई ।
दुःख उधळायास आता आसवांना वेळ नाही ॥

गतीचा शोध घेत, त्यांनी जसे कुष्ठरुग्णांचे जीवन आरोग्यपूर्ण आणि समृद्ध घडवले होते तसेच आरोग्यपूर्ण, समृद्ध जीवन आपणही घडवू या. चला, आपणही गतीचे गीत गाऊ या.

[१] स्पंदनदर निरोगी पुरुषांत सरासरीने मिनिटास ७२ ठोके असतो तर स्त्रियांत तो सरासरीने मिनिटास ८४ ठोके असतो. स्त्री-पुरुष समानतेबाबत आग्रही असणाऱ्यांनी, स्त्री-पुरुष शरीरांच्या कार्यान्वयनातील अशा मूलभूत भेदांचीही दखल अवश्य घ्यावी.

[२] सर्वसामान्य मनुष्याचा श्वसनदर मिनिटाला सुमारे १५ आवर्तने इतका असतो. एकदा श्वास आत घेणे आणि एकदा सोडणे ह्याला एक आवर्तन म्हणायचे. ऋषिमुनी मिनिटाला ५-६ एवढीच आवर्तने करत असतात. म्हणूनच ते दीर्घायुषीही होत असतात. ह्याचसाठी दीर्घश्वसन करा, म्हणजे दीर्घायुषी होऊ शकाल.

**नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

●●●

# नर्मदा परिक्रमा

**भाग : १३**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**दिवस ४३ वा.मुक्काम मानठाकूर C/o विजय सोळंकी (शेतावरील घर) कवडा - डही - जामदा स. ७ ते संध्या. ५**

हनुमानमंदिराश्रमाजवळ फक्त दोन-तीन घरे होती. बाकीचे गाव कुठे हा प्रश्न एक किलोमीटर चालल्यावर सुटला. वस्ती तिथून पुढे दोन अडीच कि. मी. पर्यंत आहे. चहा झाला नव्हता. गावात काही मुले ऊन खात बसली होती. कळले की मागे असलेल्या दुकानात चहा मिळेल. विचारल्यावर होकार मिळाल, चहा मिळाला.

प्रत्येक परिक्रमावासीला हाक मारुन चहा देणारी महिला म्हणाली, एक-दोन दिवसांपूर्वी असाच चहा दिल्यावर तिची जात विचारली गेली आणि आदिवासी आहे हे कळल्यावर चहा सोडून निघून गेले ते दोन सर्वण? परिक्रमावासी!

हा अनुभव ताजा असल्याने आम्हाला पाहूनही तिने हाक मारायचे धाडस केले नव्हते.

असा अपमान करणाऱ्या या दोघांची परिक्रमा निष्फळ होऊन उलट मैय्या कोपली असेल. तिच्या मुलांमध्ये भेदभाव करणाऱ्या आणि त्याही 'याचकांची' गणना कशात करावी?

थंडी हाडात शिरणारी. सूर्य उगवेपर्यंत आम्हीही हात चोळत चाललो होतो. हा परिसर आवडला. रस्ता वस्त्यांमधून जातो. माणसांची जाग तजेला राखते. नाहीतर 'हायवे' ने जाताना किती रूक्ष वाटते याचा अनुभव होताच. इतकेच नाही तर गुजरातमध्ये तर गावे आहेत की नाहीत हेच कळत नसे कारण हायवेपासून २ ते ३ कि. मी. आत गावे असत.

या वाटेने टेकड्या, पठारे असली तरी शेतीही शक्य तिथे होती. गव्हाची तरारलेली हिरवाई मनाला फार आल्हाहदायक वाटते. एका ठिकाणी तर मैदानभरून मिरच्या वाळत घातल्या होत्या हिरव्या / लाल. काही महिला मिरच्यांची विगतवारी करीत होत्या.



कळले की, सर्व मिरच्या एका जातीच्या, पण लाल मिरच्या ४००० रु. तर हिरवट मिरच्या ६००० रु. (टन?) विकल्या जातात (२० कि. ग्रॅ. ८० ते १५० रु. भाव मागे पाहिला होताच).

जलवट गाव आले आणि पानांची जोरदार सळसळ ऐकू येऊ लागला. भन्नाट वारा झाडांशी, पानांशी गप्पा मारत होता. यात पिंपळपानांची आघाडी होती.

जलवटला आणखी एक अद्भुत गोष्ट पाहिली. एका हातपंपातून पाण्याचा जोरदार प्रवाह उसळत होता. कुठे मोटर पंप जोडला आहे का हे पाहिले तर कळेना. चौकशी केली तेव्हा कळले की १४ -१८ वर्षे या

'पाताळतळ' विहिरीतून अखंडपणे पाणी असेच २४ तास उसळत बाहेर पडतेय! अशीच आणखी एक 'पाताळतळ' कुआँ याच गावात शाळेजवळ आहे.

आजपर्यंत हा उल्लेख कुठेही झालेला नाही. इथून जाणाऱ्या प्रत्येकाला हे दिसतेच दिसते, परंतु साधक जपात मग्न तर इतर कुणाला हा चमत्कार आहे हेच कळले नसेल.

पुढे पुढे जायच्या व्यसनामुळे, असेच निघून जात असतील पुढल्या तीर्थाकडे!

डही गाव हे धार जिल्ह्यातील तालुक्याचे गाव. इथे मासे, कोंबड्यांपासून फळफळावळ, शेती साहित्य, किराणा यांसह सर्व सर्व काही मिळते.



इथे महुआ आणि (काळा) गूळ विकायला असतो. पैकी मोहाची फळे, फुले आदिवासी विकायला आणतात. दुकानदार ती ३४/३५ रु. किलोने विकतो आणि २०/२५ रु. भावाने विकत घेतो.

मध्यप्रदेश लागल्यापासून ऐटबाज शिंगांचे धष्टपुष्ट आणि उंचेपुरे बैल दिसणे नाहीसे झाले आहे. महाराष्ट्र-कोकण-ठाणे येथील गुरांसारखी गुरे इथे दिसतात.

साग चांगल्या प्रमाणात आहे. दोन दिवसांपूर्वी गच्च लाल फुलांनी भरलेला एक पलाश वृक्ष दिसला. खरे म्हणजे पळस फुलायला अवधि आहे पण हा एक अपवाद असावा! बाजारपेठेत एका मुस्लीम विक्रेत्याने बोलावून ॐ कोरलेल्या ३ अंगठ्या भेट दिल्या. पुढे वाटेत अशोकने एका आजारी मुलीला औषध दिले.

आमची वाटचाल फार आनंददायी होती. भरपूर थंडीमुळे उन्हाचा त्रास झालाच नाही. दुपारी कुठे स्नान करावेसे वाटलेच नाही. 'डही' गावात खाल्ल्यामुळे भोजनालाही थांबावे लागले नाही.

'डही' गावापूर्वी एका ठिकाणी वजनकाटा दिसला म्हणून वजन केले. अशोक ५ किलो, मी ३ किलो व मंगल २ किलो अशी घट आमच्या वजनात आली आहे.

'डही' मधून मार्गस्थ होताना एका दुकानदार महिलेने हाक मारुन चहा दिला. कुरमुरे / शेव भेळ दिली आणि अखेरीस ३ पौष्टिक काजूही दिले.

आमचे वजन कमी होतेय म्हणून मैय्याने घेतलेली ही काळजी का! नर्मदे हर !!

टेकड्या, टेकडी पठार, ओसाड भाग, त्यातच काही टेकड्यांवर शेती असा निसर्ग चमत्कार, मानवी प्रयत्नांना आलेले यश यांचा संगम पाहत पाहत आम्ही धरमपुरीकडे चाललो होतो; परंतु ५ कि. मी. अलीकडे, संध्याकाळचे ५ वाजत आल्याने जामदा गावात मुक्काम केला.

आजूबाजूला शेती असलेले एक मोठेसे घर पाहून मी पुढे झालो व सांगितले की धरमपुरीस पोहोचणे शक्य नाही तेव्हा आजच्या मुक्कामाला तुमची अनुज्ञा आहे का!

कोणतेही आढेवेढे न घेता होकार मिळाला. बाहेर गुरे बांधलेली होती, शेळ्या होत्या, दोन कुत्र्याची आईविना पिल्ले होती. कोंबड्या होत्या.

मानठाकूर नावाचे हे कुटुंब ओसरीवरच राहत होते. आम्हीही पथाऱ्या लावल्या. स्नान, कपडे बाजूच्या टाकीवर आटोपले. नंतर कळले की आम्ही पथाऱ्या लावल्या तो गोठा आहे आणि रात्री गुरे इथे आत बांधतात.



दोन मोठ्या खोल्या मागे होत्या. दोन्हींमध्ये शेतीची साधनसामग्री इ. होती. एका खोलीत थोडी सफाई करून आसने लावली. दिवे नव्हते. रात्री ८ ते १२ आणि सकाळी ४ ते १२ अशी आहे विजेची वेळ!

मैथ्यापूजन आटोपून थोडी विश्रांती घेतली. दिवे आल्यावर जेवलो व नंतर उशिरापर्यंत डायरी लिहीत बसलो होतो.

जेवणापूर्वी शेतीचा खरा मालक श्री. विजय सोळंकी आला. आमची विचारपूस केली व दूध काढायला आलेल्या शिक्षकासह परत गेला. मालक ५ कि. मी. वरील धरमपुरी गावात राहतात. शिक्षक दांपत्य त्याच गावात शाळेत नोकरीला असून भाडेकरू म्हणून सोळंकी यांच्या घरात राहतात.

मानठाकूर कुटुंब मजुरीवर शेती सांभाळतात परंतु आम्हांला आसरा दिला कारण (मालकांचा) तसा सांगावा त्यांना आहे असे सोळंकी नंतर म्हणाले.

**दिवस ४४ वा. जामदा-धरमपुरी-निसरपूर**

चहापाणी घेऊन जामदा सोडले. धरमपुरी गाठले. रस्ता धरमकुआँपर्यंत डांबरी (एक सुंदर हनुमान मंदिर) नंतर कच्चा रस्ता उजवीकडे धरमपुरीकडे घेऊन जातो.

स्नानासाठी गेलो होतो, पण बांधामुळे हे पाणी सरोवरातील पाण्यासारखे अप्रवाही झाल्याने स्नान करावेसे वाटले नाही. शिवाय किनारा चिखलयुक्त होता, घाट वगैरे नाही.

हनुमान मंदिर तिथेच आहे, तिथे रामआश्रम बाबांची कुटी आहे. दोन दिवसांपूर्वी उमरठ्याला परिक्रमामार्गाची तपशीलवार पुस्तिका पाहिली होती. १० रु. ची ही मार्गदर्शिका अत्यंत उपयुक्त आहे हे तेव्हा कळले. प्रकाशन उपलब्धता ॐ कारेश्वर.

आज हा विषय काढल्यावर रामाश्रम बाबांनी चहासह ही पुस्तिका आम्हांला भेट दिली. इथे येऊन स्नान झाले नाही / केले नाही, पण ३ कि. मी. चा फेरा वाया न जाता ही अमाल भेट मात्रे मिळाली.

मागे वळून कच्च्या दुसऱ्या मार्गाने किकरवास हे गाव आले. बंदरसिंग रतनसिंग डावर या (आदिवासी) शेतकऱ्याकडे मक्याची भाकारी व मुगाचे वरण असे भोजन स्नानान्ती केले. १२ वाजता गावात आलो नि २ वाजता पुन्हा मार्गस्थ झालो. मध्यप्रदेशात शिरल्यापासून म्हणा, मोटरसायकलींचे प्रमाण तुलनेने फार कमी आढळले. कदाचित आर्थिक संपन्नता कमी असावी. उशीर झाला तरी २० किलोमीटर पुरे करून निसरपूर गाठायचेच असे ठरविले होते. परिणती म्हणजे ५ वाजता गावाच्या अलीकडे असलेले हनुमान मंदिर गाठले (तोतलाराम बाबा). इथे जंगलात राहू नका, गावात नीळकण्ठेश्वरात सोय आहे असे बाबाजी सांगत होते, परंतु थकव्यामुळे रात्री पुढे पाऊलही टाकण्याची शक्ती नव्हती.

अखेर मंदिराशेजारची आश्रमाची खोली बाबांनी दिली. चूल पेटवता येत नव्हती म्हणून उठून जी ही नीट पेटवली. वर ठेवलेले बवट उकडून आणुन दिले. तूप दिले, व नंतर दूधही प्यावयास दिले. तूप देण्याचे प्रयोजन कळले नव्हाही पण कवडा गावातही तूप दिले होते ते वातींसाठी ठेवले,आजही डब्यांत भरुन घेतले. तेली भङ्यान बाबाने दिलेल्या तुपाच्या डब्यांचे पुनर्भरण (Refilling) तर मैय्या करीत नसावी ?

गावाजवळ येताना लिंबाच्या बागा दिसल्या, गव्हाची शेती बहुसंख्य दिसली. डोंगर मागे पडत चालले आहेत.

धरमराय ते तिसरपूर रस्ता डांबरी नाही. धरमकुआँपासून सरळ येणारा रस्ता डांबरी असावा, परंतु चंदनखेडीपर्यंतच. परंतु आम्ही पार केला तो रस्ता चंदनखेडी सोडता पूर्ण मातीचा आहे.

झाडे तुरळक आहेत, तीही गावाजवळ; पण बाकीचा सर्व रस्ता शुष्क/माळ आहे. थंडी भरपूर म्हणून वाटचाल सहज झाली. एरव्ही खूप कठीण!

**श्री. अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

# भारताचे पूर्व व आग्नेय आशियाशी संबंध : एक दृष्टिक्षेप

*भारताच्या पूर्व व आग्नेय आशियासोबतच्या ऐतिहासिक संबंधाविषयी माहिती देणारा लेख - संपादक*

प्राचीन काळापासून भारताचा आशियातील चीन, श्रीलंका, ब्रह्मदेश (म्यानमार), मलेशिया (मलाया द्वीपकल्प), इंडोनेशिया (सुमात्रा, जावा, बाली) ह्या देशांशी संपर्क असल्याचे आपणांस आढळते. चीनचा विचार केला तर असे निदर्शनास येते की, भारत व चीनचा संपर्क तीन मार्गांनी चालत आहे. पहिला मार्ग भारताच्या वायव्येतील खैबर खिंड ओलांडून अफगाणिस्तान व मध्य आशिया, ज्यात सध्याच्या उझबेकिस्तान, ताजिकिस्तान इत्यादी राष्ट्रांचा समावेश होतो, तेथून चीनच्या वायव्येकडून चीनमध्ये जात असे. चीन व भारतातील दुसरा मार्ग ब्रह्मदेशाच्या उत्तरेकडून चीनच्या नैर्ऋत्य भागातून चीनमध्ये शिरत असे तर तिसरा मार्ग हा जलमार्ग (समुद्रमार्ग) होता. सदर जलमार्ग भारताच्या पूर्व किनाऱ्यापासून (प्रामूख्याने दक्षिण भारतातील) सुरू होऊन इंडो-चीन (सध्याचे कंबोडिया, लाओस व व्हिएटनाम हे देश) व इंडोनेशियाच्या समुद्रकिनाऱ्यांहून चीनच्या समुद्री तटांपर्यंत जात असे.

आपल्या दृष्टीने हा तिसरा जलमार्ग फार महत्त्वाचा ठरतो कारण या मार्गामुळे भारताचा आग्नेय आशियातील अनेक देशांशी थेट संपर्क आला. दक्षिण भारतातील अनेक राजघराण्यांनी आग्नेय आशिया आणि भारतातील व्यापारी व सांस्कृतिक संबंधांना मोठ्या प्रमाणात चालना दिल्याचे आपणांस आढळते. आशिया व आग्नेय आशियाशी आलेल्या या संपर्कामुळे भारत व या प्रदेशांमधील देशांत सांस्कृतिक देवाण-घेवाणीसदेखील सुरुवात झाली. इतिहासाचा अभ्यास केल्यास आपणांस असे आढळते की, मोठ्या प्रमाणात भारतीय व्यापारी ब्रह्मदेश, इंडोनेशिया इत्यादी ठिकाणी जाऊ लागले. व्यापार करत असतानाच त्यांनी आपल्या धर्माचेदेखील जतन केले. त्यामुळे भारतातून या प्रदेशांमध्ये जाणारा भारतीय व्यापारी हिंदू असेल तर तो आपल्या हिंदू धर्माप्रमाणे पूजा-अर्चा करीत असे. जर एखादा भारतीय व्यापारी बौद्ध असेल तर तो आपल्या धर्माप्रमाणे आचरण करीत असे. भारतातून व्यापार वा इतर कुठल्याही कारणांमुळे आशिया व प्रामुख्याने आग्नेय आशियातील अनेक देशांमध्ये गेलेले भारतीय कालांतराने या ठिकाणी स्थायिकदेखील होऊ लागले. त्यामुळे त्यांच्या माध्यमातून आग्नेय आशियामध्ये भारतीय धर्मांची व संस्कृतीची मुहूर्तमेढ रोवली गेली असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्यामुळे प्राचीन काळापासूनच कंबोडिया, अन्नाम (व्हिएटनाम), मलेशिया, सुमात्रा, जावा तसेच बाली या ठिकाणी हिंदू धर्माचा प्रसार झालेला दिसतो. या सर्व प्रदेशांमध्ये अजूनही अनेक हिंदू मंदिरांचे व बौद्ध स्तुपांचे अवशेष आढळतात. एवढेच नव्हे तर आजही या देशांमध्ये अगदी जुन्या काळातील हिंदू मंदिरे अस्तित्वात आहेत. कंबोडिया, व्हिएटनाम, इंडोनेशियातील जावा, सुमात्रा, बाली इत्यादी ठिकाणी तर प्राचीन काळात हिंदू राज्ये अस्तित्वात आली होती अशी माहिती मिळते. आपण आजही या देशांमध्ये गेल्यानंतर त्यांच्या सांस्कृतिक व धार्मिक जीवनावर असलेला भारतीय पगडा प्रकर्षाने जाणवतो.

भारतातून गेलेल्या हिंदू लोकांनी मलायाच्या द्वीपकल्पात इसवी सनाच्या पहिल्या पाच शतकांत अनेक राज्ये स्थापन केली होती. जावा व सुमात्रातदेखील भारतीयांनी आपली राज्ये स्थापन केली होती. तेथील काही

राजांची नावे पूर्णवर्मन व संजय ही होत. सध्या व्हिएटनाम म्हणून ज्ञात असलेल्या देशात इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापर्यंत हिंदू राज्याची स्थापना झाली होती व राज्याच्या राजधानीचे ठिकाण 'चम्पा' हे होते. त्यामुळे हे संपूर्ण हिंदू राज्यदेखील त्या काळात 'चम्पा' या नावाने ओळखले जात असे. या राज्याविषयीची विस्तृत माहिती आपणांस 'श्रीमर' या राजाच्या संस्कृत शिलालेखावरून मिळते. 'चम्पा', ज्याला अन्नाम म्हणूनदेखील ओळखले जाते, येथील दुसरा प्रसिद्ध राजा म्हणजे भद्रवर्मन हा होय. या राजाच्या काळात राज्यातील प्रांतांना दिलेली अमरावती, विजय व पांडुरंग ही नावे लक्षणीय आहेत व ती त्यांचा हिंदू धर्माशी असलेला थेट संबंध दर्शवितात. कम्बुजा (आधुनिक कंबोडिया) येथील सर्वांत आधीच्या हिंदू राज्यास चिनी लोकांनी 'फुनान' असे म्हटले आहे. इसवी सनाच्या तिसऱ्या शतकातील चिनी वृत्तान्तांनुसार या राज्याची निर्मिती वा स्थापना कौंडिण्य नामक ब्राह्मणाने केली होती. हा ब्राह्मण भारतातून आलेला होता. असे म्हटले जाते कि, तेथील मूळचे लोक बऱ्याच प्रमाणात मागासलेले होते व स्त्री-पुरुष नग्न अवस्थेत फिरताना आढळत. परंतु कालांतराने हिंदू राजांनी येथे सांस्कृतिक बदल घडवून आणून जनतेमध्ये आमूलाग्र बदल घडवला व चांगल्या सभ्यतांची (Civilization) सुरुवात केली.

आपल्या देशाच्या ईशान्येला असलेल्या ब्रह्मदेशावरदेखील हिंदु व बौद्ध संस्कृतीचा मोठा पगडा आहे. भारतातील 'तेलंगणा' या राज्यातील लोक प्राचीन काळात ब्रह्मदेशात गेले होते असे इतिहासकारांचे म्हणणे आहे. ब्रह्मदेशातील भारतीयांच्या वसाहतीस 'रामण्णा-देश' नावाने संबोधले गेले आहे. ब्रह्मदेशातील अनेक लोकांनी बौद्ध धर्माचादेखील स्वीकार केला होता व सुरुवातीस तेथील लोक बौद्ध धर्माच्या हीनयान या पंथांशी जोडलेले होते. तामीळनाडूपासून पूर्वेकडे बंगालचा उपसागर व हिंद-महासागराच्या मध्ये वसलेल्या श्रीलंका या देशावरदेखील प्राचीन काळापासून भारताचा पगडा राहिलेला आहे. श्रीलंकेत बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी सम्राट अशोकाचे पुत्र महेंद्र इसवीसन पूर्व तिसऱ्या शतकात गेले होते असे दाखले आपणांस इतिहासात आढळतात. आग्नेय आशियासोबतच भारतीय संस्कृती आणि बौद्ध धर्म चीन व जपानपर्यंत प्राचीन काळातच पोहोचलेला आपणांस आढळतो.

वरील सर्व विवेचनावरून लक्षात येते की, जवळजवळ १००० वर्षांपूर्वी मध्य, दक्षिण, पूर्व व आग्नेय आशियावर भारतीय धर्म व संस्कृतीचा पगडा तर होताच, मात्र आपले व्यापारी संबंध देखील चांगले होते.

१९४७ साली भारत ब्रिटिशांच्या राजवटीतून स्वतंत्र झाल्यानंतर स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व भारत सरकारने वर नमूद केलेल्या देशांशी सौहार्दार्याचे संबंध ठेवण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. याचाच एक भाग म्हणजे स्वतंत्र इंडोनेशियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष डॉ. सुकार्णो तसेच १९४९ च्या चीनमधील साम्यवादी क्रांतीनंतर चीनचे पंतप्रधान झालेले चाऊ-एन-लाय व पंडित जवाहरलाल नेहरू यांचा एकमेकांशी आलेला संपर्क व त्याचेच फलित म्हणजे १९५५ साली इंडोनेशियात झालेली बांडुंग परीषद याचे उदाहरण वा दाखले देता येतील. दुसऱ्या महायुद्धानंतर (१९४५) अमेरिकेची संयुक्त संस्थाने (अमेरिका) व सोव्हिएत संघ या दोन महासत्ता अस्तित्वात आल्या आणि त्यांच्यात जोरदार शीतयुद्धाची सुरुवात झाली (शीतयुद्ध हा चर्चेचा वा लिखाणाचा वेगळा भाग होऊ शकतो.) या शीतयुद्धामुळे जगातील अनेक देश अमेरिका वा रशियाच्या समथनार्थ उभे राहिले. अशा परिस्थितीत भारताने पुढाकार घेऊन आशिया, आफ्रिका व दक्षिण अमेरिकेतील म्हणजेच तिसऱ्या जगातील देशांची मोट बांधून अलिप्ततावादाचा (Non-alignment) पुरस्कार केला. अलिप्ततावादाचा मूळ उद्देश शीतयुद्धापासून दूर राहून व दोन्ही महासत्तांशी समान अंतर ठेवून आपापल्या देशांतर्गत समस्यांवर लक्ष केंद्रित करणे, तिसऱ्या जगातील देशांनी आपापसात सलोख्याचे संबंध ठेवून व्यापार वाढविणे आणि आर्थिक व सामाजिक प्रगती करण्यावर भर देणे हा होता.

१९६२ साली चीनने भारतावर आक्रमण करून काश्मीरमधील बराच भाग गिळंकृत केला. तोपर्यंत आपण ‘हिंदी-चिनी भाई-भाई’ च्या आणभाका घेत होतो. मात्र १९६२ साली आपणांस चीनचे खरे रूप व त्याच्या धोरणांचाच प्रत्यय आला. तेव्हा जाणवले की, ‘हिंदी-चिनी भाई-भाई’ या गोंडस घोषणा वा जयजयकाराच्या आड लपून चीन भारतावर आक्रमण करण्याचे मनसुबे रचत होता. एवढेच नव्हे तर त्याने भविष्यात आशियातील चीनचा सर्वांत मोठा स्पर्धक भारत असेल असे मनोमन ठरवून टाकले होते. भारताचा इतिहास व संस्कृती पाहता चीन किती चुकीच्या दृष्टीने विचार करत होता हे आपणांस जाणवते, कारण ५००० वर्षांच्या इतिहासात भारताने इतरांकडून हिसकावून घेण्याऐवजी इतरांना सामावून घेणे व भारतातील चांगल्या गोष्टी जगाला देणे हेच केलेले दिसते.

अशा प्रकारे १९६० च्या दशकानंतर ते आजपर्यंत भारत व पूर्व तसेच आग्नेय आशियातील देशांमधील संबंध मोठ्या प्रमाणात सुधारून व्यापाराची वृद्धी व्हावी या प्रकारची ठोस पावले उचललेली आपणांस दिसत नाहीत. मात्र, त्याच वेळी चीनने गेल्या पन्नास वर्षांच्या अधिक काळात ब्रह्मदेश, मलेशिया, व्हिएटनाम, इंडोनेशिया इत्यादी देशांसोबत संबंध वाढवण्यावर भर दिलेला आढळतो. एवढेच नव्हे, तर या देशांसोबत मोठ्या प्रमाणात व्यापार वाढविण्यावरदेखील चीनने भर दिलेला आहे. गेल्या दहा वर्षांत तर चीन व श्रीलंकेचे परराष्ट्र संबंध झपाट्याने सुधारलेले आढळतात. श्रीलंका सध्या चीनला आपल्या जवळच्या मित्रांपैकी मानतो. चीनच्या सैन्याची श्रीलंकेतील हजेरी प्रकर्षाने जाणवते व ही भारतासाठी धोकादायक बाब आहे.

चीनने, पाकिस्तानला व चीनला जोडणारा महामार्ग बांधला आहेच; मात्र असाच चीन व ब्रह्मदेशाला जोडणारा महामार्गदेखील त्यांनी बांधला आहे. याची प्रथमदर्शनी माहिती, दिनांक ११ डिसेंबर २०१४ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालयात आलेल्या श्री. नोमियो मिझोकामी या जपानमध्ये हिंदी भाषा शिकविणाऱ्या जपानी प्राध्यापकाने दिली. प्रस्तुत लेखाच्या लेखकाने त्यांना भारत-चीन व जपान संबंधांबाबत प्रश्न विचारला असता ते हिंदीत म्हणाले ‘चीन कभी भी भारत का दोस्त नहीं हो सकता.’ मात्र त्यांनी हेदेखील नमूद केले की भारत व जपान हे आशियातले येणाऱ्या काळातील नैसर्गिक मित्र आहेत.

या बाबतीत, भारताचे सध्याचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी उचललेली पावले निश्चितच वाखणण्याजोगी आहेत. त्यांनी २०१४ मध्ये जपानला भेट दिली. तेथील ओसाका प्रांतातील क्योटो-सँग्यो या विद्यापीठातदेखील ते जाऊन आले. येथे अजून एक गोष्ट नमूद करण्यात आनंद होतो की , विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या पुढाकाराने जपानमधील याच क्योटो-सँग्यो विद्यापीठातील जपानी विद्यार्थ्यांचा चमू प्राध्यापक श्री. मिशियो यानो यांच्या नेतृत्वाखाली गेली तीन वर्षे जोशी-बेडेकर महाविद्यालय व डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन संस्थेस भेट देत आहेत. आपले पंतप्रधान नेमक्या याच विद्यापीठाला भेट देऊन आले याचा आम्हांला रास्त अभिमान व आनंददेखील आहे.

इंडोनेशिया व भारत व्यापारवृद्धी संबंधात भारताचे माजी पराष्ट्र सचिव श्री श्याम सरन यांनी १३ जानेवारी २०१५ च्या बिझनेस स्टँडर्ड या इंग्रजी वर्तमानपत्रात सुरेख लेख लिहिला आहे. त्या लेखात त्यांनी म्हटले आहे की, सध्याचे इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष जोको विडोडो - ज्यांना ‘जोकोवी’ म्हणूनदेखील संबोधले जाते - व भारताचे सध्याचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांची अनेकदा एकमेकांशी तुलना केली जाते. याचे प्रमुख कारण म्हणजे हे दोन्ही नेते अतिशय साधारण पार्श्वभूमीतून व कुटुंबातून आलेले आहेत. असे असूनदेखील त्यांनी आपापल्या देशातील उच्च राजकीय स्थाने आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर मिळविली आहेत. तसेच त्यांनी सत्तेत आल्यानंतर आपापल्या देशातील जनतेच्या व प्रामुख्याने तरुणांच्या

इच्छा-आकांक्षा वाढविलेल्या आहेत. दोघांनाही लोकशाही बळकट करताना भ्रष्टाचारासारख्या समस्यांना व आव्हानांना तोंड देऊन आर्थिक प्रगती घडवून आणावयाची आहे. या पार्श्वभूमीवर जोको विडोडो व नरेंद्र मोदी यांची भेट १२ नोव्हेंबर २०१४ रोजी म्यानमानामधील नेपीडॉ (Naypyidaw) या शहरात पूर्व आशिया शिखर परिषदेच्या (East Asia Summit) निमित्ताने झाली. या भेटीत त्यांच्यात कोळसा व संरक्षणविषयक कारखाने या विषयांवर चर्चा झाली. महत्त्वाची बाब म्हणजे, विडोडो यांनी भारत व इंडोनेशियात सामुद्रिकी क्षेत्रांत परिपूर्ण सहकार्य नसल्याची मल्लीनाथी केली. त्यांचे हे वाक्य फार महत्त्वाचे आहे. नेमक्या याच बाबतीत इंडोनेशियाा व चीनच्या दरम्यान चांगले संबंध प्रस्थापित होत असल्याचे जाणवते. हीच पुन्हा एकदा भारताच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे. जर भारताचे प्राचीन काळात ह्या प्रदेशांशी चांगले व्यापारी संबंध होते व भारतीयांनी तेथे जाऊन राज्ये प्रस्थापित केली होती, तसेच या प्रदेशावर भारतीयत्वाचा एवढा पगडा आहे तर मग आपले त्या देशांशी व्यापारी व संरक्षणविषयक संबंध म्हणावे तसे का प्रस्थापित होऊ शकले नाहीत हा मोठा यक्षप्रश्न आहे. दुसऱ्या बाजूने चीनने आपल्या आक्रमक पराराष्ट्रनीतीने हा संपूर्ण प्रदेश पिंजून काढला आहे आणि हिंद महासागर व प्रशांत महासागरांच्या दरम्यानच्या प्रदेशांवर आपला प्रभाव पाडण्यास सुरुवात केली आहे. भारताने याची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. भारताने आपल्या या देशांशी प्राचीन काळापासून असलेल्या संबंधांना उजाळा देऊन या देशांसोबत निदान व्यापारी संबंध वाढविण्यावर भर दिला पाहिजे.

भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचा तर पूर्व व आग्नेय आशियाशी व्यापार हा जिव्हाळ्याचा विषय होता. त्यांनी त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीत या देशांशी व्यापारी संबंध वाढावेत यासाठी प्रयत्न केले होते. त्यांनी श्री. संजय बारु यांना १९९० च्या दशकात पूर्व व आग्नेय आशिया आणि भारत यांच्या व्यापारावर लिखाण करण्यास प्रवृत्त केले होते. असे असतानासुद्धा गेल्या दहा वर्षांतदेखील वर नमूद केलेल्या देशांसाबेत व्यापारी संबंध म्हणावे तसे मोठ्या प्रमाणात का वाढले नाहीत हे सर्वांना पडलेले कोडे आहे. या सर्व पार्श्वभूमीवर भारताने श्रीलंका, म्यानमार, थायलंड, मलेशिया, इंडोनेशिया, कंबोडिया, व्हिएटनाम इत्यादी देशांमध्ये उद्योगधंद्यांची वाढ करण्यास सुरुवात केली पाहिजे. भारतातील अंबानी, टाटा, बिर्ला, अझीम प्रेमजी, शिव नाडर इत्यादी उद्योजकांनी पुढाकार घेऊन तेथे गुंतवणूक करण्याची गरज आहे. भारताची आर्थिक प्रगती होण्यासदेखील याची मदत होईल. श्री. नरेंद्र मोदींसारख्या कार्यकुशल, मेहनती व सक्रिय पंतप्रधानांच्या नेतृत्त्वाखाली हे होणे शक्य आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

**संदर्भ**


मजूमदार आर.सी. - एन्शियंट इंडिया

थापर रोमिला - अर्ली इंडिया - फ्रॉम द ओरिजिन्स टू ए.डी. १३००

शास्त्री नीळकंठ के. ए.- साउथ इंडिया अँड साउथ-ईस्ट एशिया स्टडीज इन देअर हिस्ट्री अँड कल्चर

चंद्रा बिपिन, मुखर्जी मृदुला, मुखर्जी आदित्य - इंडिया आफ्टर इंडिपेन्डन्स (१९४७-२०००)

बाशम ए. एल. - द वंडर दॅट वॉज इंडिया

श्याम सरन - बिझनेस स्टँडर्डमधील लेख (१३ जानेवारी २०१५)

बारु संजय - द एक्सिडेंटल प्राइम मिनिस्टर

वर्ल्डबुक एनसायक्लोपेडिया



**साहा.प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**

उपप्राचार्य व इतिहास विभाग प्रमुख

जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*श्री. साने यांच्या विचारपरिपूर्ण लेखमालिकेतील हा पुढील लेख - संपादक*

**प्रास्ताविक**

दिशाच्या फेब्रुवारी २०१५ च्या अंकात मी दोन विषयांची चर्चा पुढल्या अंकात करीन, असे आश्वासन दिले होते. १) भगवद्गीतेतील दुसऱ्या अध्यायातील श्लोक ३९ पासून पुढे, हा बदल, '**एक दिशाबदल**' आहे व तो का हे सांगणार होतो. त्यात थोडा क्रमबदल करणार आहोत.

२)'प्राण' या संकल्पनेबद्दल '**प्राणमयं जगत**' ह्या वाचस्पति अशोककुमार चट्टोपाध्याय, ह्यांच्या पुस्तकात 'श्वास' व 'प्राण', ह्या दोन शब्दांतील फरक, प्राण हा महत्त्वाच्या जीवनाचा भाग असताना, त्याचा कसा चुकीचा अर्थ प्रचलित आहे, हा विचार नंतर मांडणार होतो.

ह्या अंकात मुख्य 'प्राण' ह्या शक्तीचा खरा अर्थ बघू या.

प्राण ह्या विचाराचा स्रोत कायम ठेवण्याकरिता त्या विषयाचा विचार आपण ह्या अंकात प्रथम करू या.

ह्याकरिता गीतेतीलच आधार असणारा हा सातव्या अध्यायातील ७ वा श्लोक बघू या :-

मत्तः परतरं नान्यत्किंचिदस्ति धनंजय।
मयि सर्वमिदं प्राणं सूत्रे मणिगणा इव।।७।।

अध्याय ७ श्लोक ७

**भगवद्गीता रहस्य**

ह्याचा लो. टिळक कसा अर्थ करतात ते पाहू या. ''माझ्याहून पलीकडचे हे धनंजया! दुसरे काहीही नाही.

Bal Gangadhar Tilak



दोऱ्यात अनेक मणी ओवावे त्याप्रमाणे माझ्या ठायी हे सर्व ओवलेले आहे.''

काय आहेत हे मणी ओवलेले?


गीतेच्याच ४/७ व्या (Pg.129) श्लोकातच याची यादी दिली आहे.

''पृथ्वी, प्राणी, अग्नि, वायु, आकाश - ५ सूक्ष्म भूते''

मन, बुद्धी आणि अहंकार हे मिळून आठ प्रकार असे हे सर्व मिळून '**माझी**' **(श्रीभगवात उवाच)** 'प्रकृति' आहे.

भौतिकवादाने आपली दृष्टि बहिर्मुखी बनवली आहे. यात मानव जीवनाचा अर्थ व सफलता याचा :- आदि आणि अंत, या दोन्हींचा पत्ता नाही, प्रश्न नाही!!

म्हणूनच, पूर्ण दर्शन होण्यासाठी **दृष्टी 'अंतर्मुख'** होणे आवश्यक आहे.




ज्या भौतिकवादी विज्ञानशास्त्रावर पूर्ण विश्वास टाकून ह्याच पद्धतीचा बुद्धिवाद व मानवी तर्कशास्त्र हे **जीवनाचा सत्य अर्थ** आहे, असे मानतात. ह्यावर "End of Science" ह्या




जॉन हॉर्गन यांच्या पुस्तकातील निष्कर्ष बघा ना. इथे भौतिकवादी विज्ञानाच्या सर्व श्रेष्ठ विज्ञानकवाद्यांनी पराभव मानला आहे. हे सत्य समाजाला सांगणे आवश्यक आहे.

आपण आता अशा उंबरठ्यावर येऊन पोहोचलो आहोत की (‘मानव योनी’), जिचे वर्णन, "Embodied Consciousness" असे केले जाते, तिच्यासमोर मोठा प्रश्न उभा ठाकला आहे. ह्या प्रश्नाचा रोख ह्या दोन ‘‘स्थिती’’ आहेत, पण ज्या ईश्वरी योजनेने ह्या पृथ्वीवरील जीवनाशी जोडलेल्या आहेत. एका ‘वैश्विक दैवी योजनेमध्ये, त्यांच्या ज्ञानाच्या पातळीमध्ये, कोणता फरक आहे? त्याचे कारण व समर्थन काय? तसेच हा संबंध कां जोडण्यात आला असेल? आणि सर्वांत महत्त्वाचे त्या ‘कॉन्शसनेसचे’ ‘मर्यादित’ ‘अस्तित्व’ कोणाचे व त्या उलट (Infinite) अनंत काळचे अस्तित्व कोणाचे?





**शरीर व आत्मा यांचा संयुक्त मानव हे कोडे आहे.**

तेव्हा **‘शरीरबद्ध आत्मा’** या जोडरूपांत विश्वाच्या रचनेत शरीर व आत्मा या दोन स्वतंत्र कल्पना आहेत. हे कोडे सोडवायचे आहे!!

सर्वांत थोडक्यात सांगावयाचे म्हणजे ज्या वैश्विक योजनेमध्ये ‘भौतिक मर्त्य’ शरीरबद्ध चैतन्य (आत्मा, प्राण) ह्या संयुक्त ‘पुरुषाचे पुरुष जीवन’ कंठावयाचे आहे, त्या यंत्रणेलाच प्राथमिक ज्ञान (भौतिकाचे), त्यानंतर त्याचे संस्कारित ज्ञान (मनन चिंतन(Psychic)) ह्या जातीचे व शेवटी दैवी, अदृश्य, अंतर्ज्ञानी व दिव्य मन आणि दिव्य बुद्धी ह्या शक्तीमार्फत संस्कारित होऊन आत्म्याला (जीवात्म्याला)प्राप्त होते, त्या Final Product ला नाकारावयाचे किंवा ‘अविश्वासार्ह’ मानावयाचे हा निर्णय मानवी भौतिकवादी पंथ आजपर्यंत का मानत आले आहेत. ‘आत्मा’ हे वैश्विक सत्य नाकारत आहेत. मग ‘शरीर’ व तेही मर्त्य ह्यावर जीवन समजणे अशक्य आहे!!

**निसर्ग कां ब्रह्म निर्माता?**




Percentage of people in various European countries who said: "I don't believe there is any sort of spirit, God or life force." (2005)[69]

ह्या विश्वाची निर्मिती ज्या कोणी केली त्याला परमेश्वर, God, अल्ला वगैरे मानणारे ‘ईश्वरवादी’ होत. याउलट ‘ईश्वर किंवा 'Intelligent Designer' वगैरे मांडणारे यांच्या मताचा ‘विचार’ ह्याचा धिक्कार करणारे ‘निरीश्वरवादी’ मानवी मनाच्या स्वरूपातील सिद्धान्त, यांचा पंथ 'Atheist' म्हणून जाणला जातो. मग हे विश्व व इतर मानवी सृष्टी कशी निर्माण झाली, याचे सरळ उत्तर न देता ते आपल्या वैचारिक भूमिका मांडतात. त्यांच्या सत्य (Objective Cosmic Truth) ह्या तत्त्वावर ‘समाधान’ होऊ शकत नाही.

पण, सर्वसाधारणपणे त्याचा उल्लेख ‘नैसर्गिक’ म्हणजे निसर्गाच्या स्वाभाविक कृतीने होतो, असे मानतात. **मग निसर्ग कसा निर्माण झाला**, ह्याचे उत्तर न देता, ते प्रतिप्रश्न करतात की ईश्वर कसा व कोणी निर्माण केला, याचे उत्तर ‘ईश्वरवादी’ पंथातून मागतात. पण ईश्वरवादी किंवा ब्रह्म वा ‘प्राणतत्त्ववादी’ हे जी थिअरी मांडतात ती तपासावयाला तयार होत नाहीत. कारण पुढे लक्षात येईलच.

**हा वाद अनंत काळ चालणार का?**

ह्या दोन विरुद्ध मतांच्या वादात हजारो वर्षे किंवा

अनेक युगे, मानव समाजाने वेळ व जीवन निष्फळपणे घालवले आहे, व आता जवळजवळ "Line of Control" (LOC) ह्या संज्ञेप्रमाणे ज्याने त्याने स्वतःला कुठल्यातरी एका पंथात सामील करून, प्रश्नाचे उत्तर शोधण्याच्या प्रयत्नाला मूठमाती दिली आहे. तीही स्वतःच्या एकांगी भौतिक तत्त्वज्ञानाच्या भरवशावर!! हे 'अस्थिर शांतीचे' (unstable peace) प्रकरण आहे.



21 DECEMBER 2014
VHP, RSS pitch for 'Hindu Rashtra', conduct 'ghar wapsi' in Gujarat; BJP keeps silent

पण हा वाद जेव्हा ह्या समाजाचे नियंत्रण कोणी करावयाचे ह्याचे उत्तर 'संख्यातत्त्वावर' टाकले आहे. म्हणजे भौतिकवादी मंडळी संख्येने जास्त असल्याने व त्यात फारसा फरक युगायुगांत न पडल्याने 'भौतिकवादी' मंडळींना सामाजिक, नेतृत्व व (Governance) अमलाचे स्थान बहाल केलेले आहे. ह्याचे प्रतिवाद असे केले जातात की हे अधिकार पूर्वी 'धर्म' ह्या संकल्पनेला मानणाऱ्यांकडे होते. पण 'धर्म' ही कल्पनासुद्धा Religion म्हणजे 'मानवनिर्मित' कल्पना असल्यामुळे खऱ्या अर्थाने भौतिकवादीच मानावयाला हवी. त्याचे कारण 'धर्म' ह्या कल्पनेत 'ईश्वर' किंवा तत्सम शक्ती असली, तरी ती 'दृश्य' नाही, त्याचा भौतिकवाद्यांना मान्य असलेला किंवा असू शकणारा **'पुरावा'** सिद्ध न करता येणारा असल्याने 'भौतिकवादी' हे आपल्या भूमिकेवर ठाम आहेत.

ह्या भूमिकेचे जास्त स्पष्ट वर्णन किंवा आतापर्यंत वर्षानुवर्षे चालणाऱ्या वादाची 'बुद्धिवादी' किंवा 'विश्वास' वादी (Assumptions) चर्वीतचर्वणे व वादळे यांना फाटा देऊन आपण ह्या प्रश्नांचा नव्या पद्धतीने विचार करू या!

## नवे उत्तर शोधू या

निरीश्वरवादी विशेषतः पाश्चिमात्य जगातील विचारवंत 'ईश्वर' ह्या संकल्पनेबद्दल दोन मुख्य वाद निर्माण करतात.



Portrait of Spencer

एक म्हणजे प्रातिनिधिक वाद, Herbert Spencer 'स्पेन्सर' याच्या नावाने ओळखला जातो. त्याला 'अज्ञेयवाद' (Agnosticism) असे म्हटले जाते. 'आम्हांला माहीत नाही किंवा जाणता येत नाही,' (We do not know) असा निष्कर्ष काढून प्रश्न निकालात काढायचा.

**Emil du Bois-Reymond**



Emil du Bois-Reymond

| | |
|---|---|
| **Born** | 7 November 1818 Berlin |
| **Died** | 26 December 1896 (aged 78) Berlin |
| **Nationality** | German |
| **Fields** | Physiology Electrophysiology |
| **Known for** | Nerve action potential |
| **Influenced** | Eduard Hitzig |

याचीच दुसरी बाजू डॉ. बॉरिस रेमंड We shall never know अशी म्हणजे (आम्हाला जाणणे शक्य नाही. **कधीच!!**) **(Thomas Huxley)** अशी लावून हा प्रश्न निकालात काढायचा अशी आहे!!



Thomas Henry Huxley

ह्या निष्कर्षाचे कारण म्हणजे ज्याला बुद्धिवाद किंवा 'वैज्ञानिक पद्धती' असे म्हटले जाईल, त्या तर्कपद्धतीने किंवा विश्वासाने पुरावे वा युक्तिवाद होऊ शकत नाही म्हणून 'ईश्वर' ही कल्पना असत्य, भ्रमयुक्त वा खोटी असे मानणारा पक्ष होय!!

## दुभंगलेले मानवी अर्थ प्राप्त जग

त्यामुळे सध्याची **'लाइन ऑफ कंट्रोल'**(LOC) ही एक मानवी विश्वास ज्या बाजूला असेल तो मानून मानवी मनांतील **'तहनाम्यावर'**(Trace) स्थित आहे. दोन्ही बाजू आपआपल्या समज वा विश्वासावर ठाम आहेत व मानवी जीवन 'सत्याचा विश्वासार्ह निर्णय' न झाल्याने, एक तऱ्हेच्या नंबर गेमवर (Number Game) गेमवर 'अस्थिर शांतता' ह्या तहाचे तत्त्व मानून जीवन कंठीत आहे.

### अशांत व अस्थिर तहनामा

ही शांतता मानवी समाजाच्या मानगुटीवर स्वार होऊन बसली आहे. कारण ह्याचे नवीन नवीन जन्माला येणाऱ्या मानवी जिवांचे Regimentation करणारी Education System हे होय!! एक तऱ्हेच्या अज्ञानी प्राणी जीवनाच्या पद्धतीने जीवन जगत आहे.

### Real question wrongly framed

कारण हा प्रश्न चुकीच्या पद्धतीने मांडला गेला आहे हे कारण आहे. (Incorrect way of framing of question!!) एक मानवी तर्कपद्धतीचा मार्ग आहे, तो असा की प्रश्न जर योग्य पद्धतीने मांडला गेला तर त्याचे उत्तर मिळतेच. पण तो चुकीचा मांडला गेला व त्यातील Factual, Objective Truth जर सर्वमान्य झाले व त्या 'फरकावर' त्या प्रश्नाचे Equation समीकरण मांडले तर नक्की उत्तर शोधण्याचा एक सर्वमान्य मार्ग सापडेल व त्यावर भविष्यातील मानवजात आपल्या 'वैश्विक निर्माता ईश्वर' या गूढाचे उत्तर शोधू शकेल व ते नक्की सापडेल!!

### नव्याने प्रश्नांची मांडणी होणे आवश्यक, मग प्रश्न नेटका कसा मांडावयाला हवा?

यासाठी योगशास्त्रावर आधारलेले सत्य ज्ञान उपलब्ध आहे.

याकरिता शरीर व आत्मा यांच्या 'ज्ञान' मिळवण्याच्या पद्धतीचा विचार व माहिती वेगवेगळी जाणू या.

### मानवी यक्षप्रश्न




शरीराच्या ज्ञानेंद्रियांचा नैसर्गिक कल शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध या इंद्रियांच्या मार्फत होतो व तो 'कल' Inchination बहिर्गत बाजूंचे आहे.

पण, ईश्वराची 'प्राप्ती' बाहेर नसून अंतरंगात अंतःकरणात किंवा चित्तात होते. ही अनुभूती तत्त्वावर आधारलेली योगसाधना आहे. त्याला ही इंद्रिये अंतर्मुखी करावी लागतात व ती होऊ शकतात.

ही क्रिया 'राजयोगाच्या मार्गाने व मनाच्या शक्तीने होते. मनाच्या मौलिक उन्नतीने होऊ शकते.

### ह्याला आधार कोणता?

**''आत्मनात्यानभि स विवेश।। (यजुर्वेद. ३२/११)**
**अर्थात, जीवात्माके द्वारा परमात्मा को प्राप्त करो।।**

आणि,

**मनसैवेद माप्तव्ययम्।। (कठोपनिषाद ४/११)**
**अर्थात ईश्वर मन (अंतःसामर्थ्य) ही से प्राप्त होने योग्य है।**

आणि

**तमात्मस्थं येऽनुपश्यन्ति धीरास्नेषां सुखं शाश्वतन्नेतरेषाम्।। कठोपनिषद ५/१२**



**''धीर पुरुष''**
अर्जुन भगवद्गीता
भगवान कृष्ण

''अर्थात, जो धीर पुरुष आत्मा में प्रवेश करके ईश्वर का साक्षात्कार करते हैं उन्हीं को चिरस्थायी सुख प्राप्त होता है, अन्यों को नहीं।

इसलिये स्पष्ट है कि इंद्रियों (Body Consciousness sense organs) से कोई ईश्वर को प्राप्त नहीं कर सकता.''
- महात्मा नारायण स्वामी (उपनिषाद रहस्य Page.99)

शिवाय, महात्मा नारायणस्वामी योगदर्शन और ब्रह्मप्राप्ती का समीपस्थ साधनः-

**श्रद्धावीर्यस्मृति समाधि प्रज्ञापूर्वक मितरेषाम्।।**
(योगदर्शन १/२०)

''अर्थात, अन्यों (विदेहों और प्रकृतियों से भिन्न)

की श्रद्धा, वीर्य, स्मृति, समाधि और प्रज्ञापूर्वक (उपाय प्रत्यय नामक असम्प्रज्ञात योग की सिद्धी) होती है। भाव इसका यह है कि जब योगी उपाय प्रत्यय नामक असम्प्रज्ञातयोग सिद्ध करता है।''

या उपायाने ऋतंभरा प्रज्ञा जागी होऊन ब्रह्म किंवा विश्वनिर्माता किंवा प्राणशक्तीचे ज्ञान प्राप्त होऊन दर्शन घडते.

याउलट हर्बर्ट स्पेन्सरच्या भौतिकवादी Agnosticism मताने (म्हणजे निरीश्वरवादी तत्त्वज्ञानाचा उल्लेख केला गेला होता) म्हणजे 'ईश्वराचे अस्तित्वच नाकारले', तेव्हा ईश्वर जाणण्याचा प्रश्नच निकालात निघतो!! ही भूमिका मानवजातीवरचा अन्याय आहे, नाही का?

पण यापुढे जाऊन जर्मनीचे विद्वान गृहस्थ Dr. Bois Raymond Ignoramous = we shall never know असा निर्वाणीचा अर्थ लावतात.

ईश्वर या संकल्पनेची अशी वास्तवता लावली असल्याने त्यावर संशोधन करण्याचा प्रश्नच शिल्लक राहत नाही.

**हे तर उघड बेजबाबदार वर्तन आहे!!**

मग भारतीय योगी, ऋषी यांनी ज्या प्रकारे इंद्रिये, मन, बुद्धी, श्रद्धा यांचा विचार करून व साधना करून त्यांच्या क्षमतेचा अंतिम सामर्थ्यापर्यंत शोध घेऊन एक पद्धती सांगितली, त्यावर तरी या भौतिकवादी विद्वानांनी असे संशोधन करणे योग्य झाले असते. पण तिथेही 'योग' अंतर्ज्ञान, इंद्रियातीत अशा पद्धतींची सत्यता नाकारल्याने व समाजाला तसा उपदेश किंवा सल्ला दिल्याने आजही भारताच्या पंतप्रधानाला (नरेन्द्र मोदी) जगापुढे ''योग'' या पद्धतीचा स्वीकार करा असे आर्जव करावयाला लागते आहे.

किती काळ मानवजातीने ह्या बेजबाबदार 'विचारवंत' 'दिशाला' थारा दिला आणि द्यावा!!

**हे काय दर्शवते?**

जेव्हा तत्त्वज्ञानात, ज्ञानेंद्रियांच्या क्षमता, प्रत्यक्ष ज्ञानाची व्याख्या, जीवनाची उद्दिष्टे, मर्यादित क्षमता व अनंताच्या ज्ञानाची अभीप्सा की जी जन्म, पुनर्जन्म ह्या वैश्विक यंत्रणेची मागणी स्वीकार करावी लागते, तेव्हा 'Scientific Temper' म्हणजे 'वैज्ञानिक प्रवृत्ती''च्या व्याख्येवरही मूलगामी विचार करावा लागतो. तसा तो कुठलीही गृहीते, पूर्वग्रह, एकांगी ज्ञान ह्यांमध्ये अडतो.

तेव्हा **विश्वास व श्रद्धा** ह्या दोन संकल्पनांमधला फरक लक्षात घ्यावयाला लागतो. 'विश्वास' ही भौतिकवादी विचारांतील 'चालू' संकल्पना आहे. जसे एखादा मार्क्सवादी माणूस गांधीवादी किंवा सर्वोदयी विश्वासाचा झाला. याचा मला अभिप्रेत अर्थ हा आहे की वैश्विक विश्वनिर्मितीच्या सत्याला आधारभूत असा मार्ग असायला हवा.

**'श्रद्धा'** ही एक आत्म्याची अंगभूत चीज असते. पण जिथे विज्ञानवाद आत्मा ही संकल्पनासुद्धा मानीत नाही, त्या संकल्पनेला 'सत्य' अस्तित्व हा 'विचारवंत' नाकारतो तेव्हा आत्मदर्शन, आत्मज्ञान, आत्मोद्धार, आत्मसाक्षात्कार वगैरे गोष्टींवर विश्वास ठेवत नसतो व तसे त्यांनी उघड कबूल करावयाला हवे!!

यावर मी भगवद्गीतेचा आधार घेऊन 'श्रद्धा' ही कशी जन्मजन्मांतरी आत्म्याच्या प्रवासाची साक्षीदार असते, असा लेख लिहिला, तेव्हाही माझ्या मनात असा विचार आला की मग धार्मिक किंवा मोठे साहित्यिक व वैज्ञानिकही इंग्रजी Soul किंवा spirit व मराठीतले वा भाषेतले हे शब्द वापरले ते एक खरा अर्थ न जाणता Rhetonic अशाच प्रकारचे असू शकेल. नाही का?

'आत्म'शब्द याला 'स्वतःचे' असे अर्थ लावायचे हा विपर्यास आहे!! तेव्हा हा 'विचारांचा, धर्माचा, तत्त्वज्ञानांचा व भौतिक व्यवहाराचासुद्धा गोंधळ पाहून वाटते की **बुद्धिपुरस्सर** ही **'गटबाजीच'** आहे.

ह्या गोंधळावर Antidote 'प्रतिबंधक उतारा' औषध म्हणजे **'शाश्वत बीजज्ञानाकडे जावयाचे!'**

**भारताच्या संदर्भात हे 'बीजज्ञान' वेदिक ज्ञान होय.**


हे श्रुती भाषेतील (आत्म्याच्या भाषेतील) 'सत्य व गहन' ज्ञान होय. ह्या ज्ञानाचा संदर्भसुद्धा जाणणे महत्त्वाचे आहे. ज्या कुठल्या 'दैवी शक्ती'ने ह्या विश्वरूपी व चैतन्यशक्ती जीवनाची निर्मिती झाली, तिला 'ब्रह्मज्ञान' व 'प्राणशक्ती' असे संबोधले जाते.

ह्या ज्ञानाची 'स्रोतगंगा' दिव्य शक्तीच्या लहरीतून Energy Wave Form वा ह्या विश्वाच्या सूर्यशक्तीच्या मार्फत मानवी जीवनाकडेसुद्धा (इतर जीवनाला धरुन) आली ती 'भारताच्या संस्कृतीने जपून, आज ह्या प्रचलित जीवनापर्यंत (२१ शतक कलियुग) पोचवली आहे. तिला 'वेदिक ज्ञान' (संस्कृतबद्ध) असे म्हटले जाते. त्या संस्कारशास्त्रात सूक्ष्म चैतन्य (जड पदार्थ) "Lowest Consciousness" ते ज्ञान मानवी शरीरबद्ध चैतन्यापर्यंत हे 'सत्य ज्ञान' आले आहे. ह्या ज्ञानाचे 'भाषांतर', 'बोध' होण्यासारखे उपनिषदे, आरण्यके, पुराणे, स्मृतिग्रंथ, दर्शनशास्त्रे व मुख्यतः योगक्रिया हठयोग, राजयोग, क्रियायोग, भक्तियोग वगैरे फलश्रुती देणारी साधनसामूग्रीसकट आजसुद्धा उपलब्ध आहे.

**संपूर्ण भौतिकवादी जगाने तिकडे पूर्ण दुर्लक्ष केले आहे**

त्या ज्ञानाच्या प्राप्तीकरिता एका महत्त्वाच्या गोष्टीची सत्ता व मालकीसुद्धा, (Ownership) मानवाला (म्हणजे जीवात्म्याला 'श्रद्धा' (आत्मज्ञान वा गीताज्ञानाचा संदर्भ) ह्या जीवात्म्याच्या शक्तीवरच्या विश्वासाने जन्मजन्मांतरी प्रवासातही उपलब्ध आहे!! हा तर चमत्कारच आहे!!

तेव्हा, सध्याच्या प्रश्नांच्या संदर्भाने त्या मानवी जीवनाला जे गूढ ज्ञान त्याच्या 'ब्रह्मज्ञान' किंवा प्राणशक्तीचे ज्ञान हवे आहे, त्याची साध्यता-सिद्धी मिळवण्यासाठीची ''योजना''सुद्धा आखीव पद्धतीने युगानुयुगे मानवी समाजाला उकलत गेली आहे. कारण तशी योजनाच आपल्याला वारसाहक्काने युगानुयुगे, पिढ्या नि पिढ्या संभाळून 'शिदोरी' सारखी (Relay-Race Baton) विश्वप्रवासात मिळाली आहे. त्या 'शिदोरी' वरच्या अन्नावर आश्रय करून ह्या गोंधळातून ईश्वरी ज्ञान मिळून आपण आपला अनंत काळचा प्रश्न (Aspirations) सोडवणार आहोत!! मान्य आहे की हा अनंत काळचा रोड मॅप (Road Map) आहे!! पण तो पूर्ण श्रद्धेने आचरला जावयाला हवा आहे जीवनाच्या 'रिले रेस' सारख्या आत्मिक व्यवहाराने!!



त्याचे नाव महायोगी अरविंदांच्या भाषेत -

"Life Divine" आणि "The Evolution of Consciousness" असे आहे.

आपला ज्वलंत प्रश्न आहे, की मानवी जीवन कुठल्या ज्ञानमार्गाने जगावयाचे. भौतिकवादी (Exclusive) की अध्यात्मवादी (निवृत्तिमार्गाने) **मोक्षमार्ग ध्येयाने?**

ह्या **मोक्षमार्गाची** अशी संकल्पना मानली जात आहे की पृथ्वीवरचे जीवन हे मिथ्या म्हणजे भ्रम आहे. त्या जीवनाच्या सुख दुःख ह्या इंद्रियज्ञानाच्या भंरवशावर जगणे ही चूक आहे; त्या जीवनाच्या शारीरिक अस्तित्वातून मुक्ती मिळवायची आणि देहाचा त्याग करून जीवात्म्याने परमात्म्याच्या सागरी वैश्विक अस्तित्वात समर्पण होऊन मुक्त पावायचे. हा विचार ज्या 'विवर्तवादी' निवृत्तिवादी संप्रदायाच्या ज्ञानावर आधारलेला आहे तो कसा चूक आहे हे आपण 'प्राणमयं जगत' - लेखक वाचस्पति अशोक कुमार चट्टोपाध्याय ISBN-81-87563-22-2 ह्या ज्ञानावर थोडेसे मागील 'दिशा'च्या अंकात पाहिले. त्याचा पूर्ण विचार आपण पुढच्या अंकात जरूर करु या!!

पण इथे आपण Integral Spiritualism म्हणजे महायोगी अरविंदांच्या The Life Divine किंवा The

Evolution of Consciousness या मार्गाचा स्वीकार करू या. तो 'पूर्णयोग' अशा नावानेही जाणला जातो. ह्या मार्गात पृथ्वीवरील जीवनाचा 'मिथ्या' असा अर्थ न लावता वैष्णवांच्या किंवा भगवद्गीतेच्या 'वासुदेव' (Consciousness) व नंतर ''पुरुषोत्तम योग'' ह्या पुढील क्रमाच्या मार्गाने ज्ञानाचा स्वीकार करू या!! ह्या मार्गामध्ये 'पृथ्वीवरचे जीवन' हे आवश्यक आहे व त्या जीवनाच्या मार्गाने जन्मजन्मांतरीच्या या दीर्घ वैश्विक जीवनात, हे जीवन एक आवश्यक टप्पा आहे, असा विश्वास वा जास्त योग्य शब्द **'श्रद्धा'** आहे (Training Part of Soul Knowledge) असे समजू या!! इथे थोडे थांबून, ह्या Spiritual अध्यात्मवादी पूर्णयोगी मार्गाला विरोध करणारे भौतिकवादी कुठला मार्ग सुचवितात? कुठले जीवन ध्येय ठरवितात? हा प्रश्न विचारणे अत्यंत गरजेचे आहे कारण असा पूर्ण विचार न करता ते फक्त 'भौतिकवादी विज्ञान' हे सत्य आहे - 'Cosmic Reality' आहे व त्या मार्गावर चालणे हे नुसतेच क्रमप्राप्त आहे असे (एवढेच) मानतात असे नव्हे तर 'आदि आणि अंत' जीवन यावर कुठल्याही प्रकारची निश्चिती झालेली नसताना, एका तऱ्हेचा 'त्रिशंकू' (ना स्वर्ग, ना नरक, ना 'मर्त्य जीवन' की जे निश्चितच मर्यादित आहे, त्या 'अनिश्चित' पद्धतीवर, भार टाकून मोकळे होतात!! हा पलायनवाद किंवा Escapism आहे!!

हे भौतिक अशाश्वत अज्ञानी जीवन आहे. पण, असा पूर्ण विचार करण्याची जबाबदारी न स्वीकारता हे **भौतिकवादी गुरू** ह्या 'अनिश्चित जीवनाचा' स्वीकार करण्याचा आग्रह समाजमनाला करतात किंवा त्याला दुसरा उपाय नसल्याने 'हतबल' झाल्यासारखा 'प्राणी जीवनासारखा अज्ञानी' मार्गावर डोळे मिटून चालण्याचा पर्याय ठेवतात!! हे मान्य न होणारे आहे!!

**क्रूर प्रश्न**

हे असे का बरे असावे? हे का स्वीकारावे समाजाने?

ह्यामुळे एक लक्षात येईल की 'आध्यात्मिक मार्गाचा अनेक शंका, बुद्धिवाद, मानवी दूषित विचारपद्धतीसुद्धा नाकारून, एक तऱ्हेचे Gamble (द्यूत पद्धत) खेळावयाला समाजाला प्रवृत्त करतात!!

तेव्हा ह्या तऱ्हेचे नेतृत्व समाजाने का पत्करावे? तर त्याचे कारण एकच की 'अध्यात्मवादाला' विरोध म्हणून!! तेव्हा हा विरोध ते का करतात त्याचे कारण अध्यात्ममार्गाचा पूर्ण विचार ते करावयाला तयार नाहीत. कारण काय तर त्या मार्गात ज्ञानाचा मार्ग हा योगमार्ग आहे व त्याची वैज्ञानिक सत्यता त्यांना मान्य नाही. का नाही तर त्या ज्ञानमार्गाची साधना ज्या मानसिक, बुद्धीच्या 'पवित्र' कृतीने करून 'राजयोग' व 'पुरुषोत्तम योग', 'भक्तियोग' मार्गाने होते अशा अध्यात्मवादाचा ते धिक्कार करतात, अमान्य करतात. शुद्धी व पवित्रता नाकारणारा हा पक्ष आहे. हे नेतृत्व गुणवत्तेवर नव्हे तर Number Game वर आधारलेले आहे!!

ह्या मार्गानाा ज्या धारणेने सत्यदर्शन घडते त्या साधना, त्या अनुभूती, तो विश्वास ते नाकारतात कारण त्यांना त्याच्याकरिता आवश्यक असणारी शुद्धता, पवित्रता कमावणे आवश्यक वाटत नाही. वैज्ञानिक पंथात बुद्धिवाद आहे; पण सत्य, शुद्ध पवित्रता व नैतिकता नाही! **कदाचित Vested Interest** सुद्धा आहे!!

ही शुचिता का आवश्यक आहे व ती कमावण्याचा विधी व आवश्यक साक्षात्कारी साधना कोणती त्याचा विचार आपण पुढच्या अंकात करू या.

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट, सारस्वत
बँकेशेजारी, अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाइल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr1@gmail.com.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### जोशी-बेडेकर महाविद्यालयाचा वृत्तान्त

### विवेकानंद स्टडी सर्कल

महाविद्यालयाच्या विवेकानंद केंद्रातर्फे स्वामी विवेकानंदांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात उद्योजक रवींद्र प्रभुदेसाई, प्रा. विद्याधर वालावलकर, प्राचार्य डॉ. शकुंतला सिंह, डॉ. विद्या नानल, प्रा. मोहन आपटे, डॉ. प्रा. इंद्रायणी रॉय इ. मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रभुदेसाई म्हणाले, 'उद्योजकतेला कल्पकतेची आणि नावीन्याची जोड असेल तर व्यवसायात यश नक्की मिळते. व्यवसाय करत असताना जे आघात होतात, त्यामधून नव्या-नव्या कल्पना सुचतात. त्यामुळे व्यवसायातील अडचणी म्हणजे नव्या दिशेने सुरू झालेली संधी असते.'

पर्यावरण संरक्षण ही प्रत्येक तरुणाची जबाबदारी असल्याचे सांगून प्रा. विद्याधर वालावलकर म्हणाले, पर्यावरण संवर्धनासाठी अनेक जणांनी सहकार्य करायला हवे.

'ठाणेकरांच्या मनातील वाहतुकीबद्दलच्या संकल्पना' या विषयावर घेतलेल्या परिषदेला विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. या वेळी प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह, प्रा. मोहन आपटे यांचीही भाषणे झाली.

याच केंन्द्रातर्फे आंतरमहाविद्यालयीन निबंधस्पर्धेचेदेखील आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा रामकृष्ण मिशन, खार यांनी आयोजित केली होती.




'भारतीय संस्कृती परीक्षा' विवेकानंद केंद्रातर्फे महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. परीक्षेतील गुणवंत, निबंधस्पर्धेच्या पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार प्रस्तुत कार्यक्रमात करण्यात आला. ही परीक्षा राष्ट्रीय युवा दिनानिमित्त आयोजित करण्यात आली होती. यशस्वी विद्यार्थी प्राध्यापकांना पाहुण्यांच्या हस्ते प्रशस्तिपत्रके देण्यात आली. या परीक्षेत प्रा. मोहिनी नाडकर्णी प्रथम आल्याबद्दल त्यांना गौरविण्यात आले. ठाण्यातील सात महाविद्यालयांतील तीनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या शकुंतला सिंह यांचे मार्गदर्शन व इतिहास विभागातील डॉ. प्रा. इंद्रायणी रॉय यांनी विशेष मेहनत घेतली.

### नवरंग - २०१४

दर वर्षीप्रमाणे याही वर्षी दि. १५ डिसेंबर ते २३ डिसेंबर २०१४ पर्यंत 'नवरंग' मोठ्या उत्साहात साजरा झाला. 'नवरंग' च्या विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

'सबल स्त्री - सक्षम स्त्री' हे या वर्षाच्या 'नवरंग' चे महत्त्वपूर्ण आशयसूत्र होते. अनेक स्पर्धांमधून या सूत्राचे दर्शन घडवले गेले. ''जागर जाणिवांचा'' हा फलक प्रत्येक स्पर्धेच्या ठिकाणी मोठ्या दिमाखात झळकत होता.

'नवरंग'चा उद्घाटन सोहळा दर वर्षीपेक्षा आगळा-वेगळा झाला. निळे पाणी आणि आवतीभोवती सुंदर फुले फुललेल्या तळ्यात नऊ रंगांची कमळे आणि नऊ रंगांच्या रिबिनी बांधलेले नऊ रंगांचे गॅस फुगे मा. प्राचार्या शकुंतला सिंह यांनी आकाशात सोडून उद्घाटन केले.

लिंबू-चमचा, लघुपट, अनुबोधपट स्पर्धा, फुगडी, बलून फोर्ट, तीन पायांची शर्यत, शेपअप, ब्लाइंड शेफर्ड इ. स्पर्धा प्रथमच 'नवरंग'मध्ये घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद आणि उत्साह 'आनंदाचे डोही आनंद तरंग' असाच होता.

मा. प्राचार्यांच्या प्रेरणेने प्रथमच 'नवरंग' मध्ये काही स्पर्धा वर्गा-वर्गात घेण्यात आल्याने यात विद्यार्थ्यांना संधी मिळाली. ज्या वर्गाचे अधिकाधिक विद्यार्थी 'नवरंग' स्पर्धांमध्ये सहभागी होऊन सर्वाधिक गुण मिळवतील त्या वर्गाला फिरता चषक प्रदान करण्यात येईल असे मा. प्राचार्यांनी जाहीर केले होते. विशेष म्हणजे हा चषक कनिष्ठ महाविद्यालयाच्या ११ वी वाणिज्य वर्गाने मिळवला.

वार्षिक पारितोषिक वितरण समारंभासाठी मा. प्राचार्य डॉ. डी. के. नाईक यांना प्रमुख पाहुणे म्हणून पाचारण करण्यात आले होते. अगदी मोजक्या भाषेत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्राचार्यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. सर्व क्षेत्रांतल्या यशस्वी विद्यार्थ्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

मा. प्राचार्या डॉ. शकुंतला अे. सिंह यांची प्रेरणा आणि मौलिक मार्गदर्शन तसेच 'नवरंग'चे अध्यक्ष प्रा. दामोदर मोरे यांच्या अथक प्रयत्नाने 'नवरंग' यशस्वीपणे व उत्साहात पार पाडला.

### गंधर्व - २०१५

जोशी-बेडेकर महाविद्यालयातर्फे दर वर्षीप्रमाणे यंदाही आंतरमहाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन २२ ते २४ जानेवारी रोजी करण्यात आले. पुणे, मुंबई, नाशिक, कोल्हापूर व ठाणे येथील विविध नव्वद महाविद्यालयांतील विद्यार्थी व शिक्षकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला.

'Nothing to Everything' या थीमअंतर्गत संपूर्ण गंधर्व सोहळा आयोजित करण्यात आला होता. या वर्षी गंधर्वमध्ये काही अभिनव प्रयोगही करण्यात आले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सुगम संगीत आणि पाककला स्पर्धा, विद्यार्थ्यांसाठी Spelling Bee, सुडोकू, Parliamentry Debate, वक्तृत्त्व, निबंध, वादविवाद, चित्रकला, पथनाट्य, वाद्य-संगीत अशा कितीतरी विविध स्पर्धांचे आयोजन या प्रसंगी करण्यात आले होते. तसेच माजी विद्यार्थ्यांसाठीदेखील काही स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. सगळ्याच महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ठ प्रतिसाद दिला. एकंदरीत विविध रंगारंगी स्पर्धांमुळे गंधर्व यशस्वीपणे पार पडले.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला ए. सिंह यांच्या मार्गदर्शन व प्रोत्साहनामुळेच हा सोहळा यशस्वी होऊ शकला. Talent Academy व गंधर्वच्या प्रमुख प्रा. मृण्मयी थत्ते आणि त्यांचे सगळे सहकारी प्राध्यापक व गंधर्वचे सर्व विद्यार्थी यांच्या अथक प्रयत्नाने आनंदात व उत्साहात रंगारंग गंधर्व सोहळा यशस्वीरीत्या पार पडला.

### स्टुडन्टस् फोरम

महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी स्थापन केलेल्या 'स्टुडन्टस् फोरम' अंतर्गत विविध राजकीय, सामाजिक व आर्थिक विषयांतर्गत साधक-बाधक चर्चा घडविण्यात येते. त्यामुळे महाविद्यालयात एक गट निर्माण झाला. हे विद्यार्थी विविध प्रकारच्या वक्तृत्त्वस्पर्धा सहभागी होतात. अशाच काही विद्यार्थ्यांच्या गटाने विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठअंतर्गत महाविद्यालयात Model Youth Parliament आयोजित केली. यासाठी परीक्षक

म्हणून विद्यापीठाचे प्रतिनिधी श्री. डॉ. हर्षद भोसले व चंद्रमोहन जोशी, प्राध्यापक कीर्ती महाविद्यालय, दादर यांनी विद्यार्थ्यांचे परीक्षण केले. त्यातून महाविद्यालयाच्या ११ विद्यार्थ्यांची मुंबई विद्यापीठाच्या संघात निवड झाली. तसेच विद्यापीठात जोशी-बेडेकर महाविद्यालयाला दुसऱ्या क्रमांकाने गौरविण्यात आले.

स्टुडन्टस् फोरम अंतर्गत १० डिसेंबर २०१४ रोजी मानवी हक्क दिवसाच्या पार्श्वभूमीवर हा दिवस साजरा करण्यात आला. प्रा. सच्चिदानंद सिंह यांचे Human Rights : Evolution and Development या विषयावर व्याख्यान झाले. विद्यार्थ्यांनी या विषयावर साधक-बाधक चर्चा केली.

दि. ३० जानेवारी रोजी मुंबई विद्यापीठातील दीक्षांत सभागृहात संसदीय कामकाज मंत्रालयांतर्गत घेण्यात आलेल्या मॉडेल यूथ पार्लमेंट स्पर्धेची मुंबई विद्यापीठाची फेरी पार पडली.

चाणक्य राष्ट्रीय विधी विद्यापीठातील साहाय्यक प्राध्यापक डॉ. द्विवेदी व महाराष्ट्र टाइम्सचे संपादक अशोक पानवलकर हे परीक्षक म्हणून लाभले होते.

यात सात विद्यार्थ्यांची उत्कृष्ट संसदपटू म्हणून निवड करण्यात आली. त्यात महाविद्यालयाची S.Y.B.Com



ची विद्यार्थिनी किरण बिष्ट हिची निवड करण्यात आली. याशिवाय अर्चना दीक्षित व विवेक तिवारी या विद्यार्थ्यांनीदेखील या स्पर्धेत संरक्षण मंत्री व नवोदित सदस्यांचा शपथविधी ही जबाबदारी पार पाडली.

स्टुडन्टस् फोरमच्या वतीने वाणिज्य तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींनी Indian Student Parliament संस्था आणि केंद्रीय युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र राज्य आणि UNESCO यांच्या वतीने आयोजित भारतीय छात्र संसदेत सहभाग घेतला या संसदेत ऐश्वर्या देशमुख, आफरिन सय्यद, रुचिका पर्वतीकर, सेजल फेरेरो व सुचेता या विद्यार्थिनींनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडवणीस, खासदार पूनम महाजन, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मा. श्री. अण्णा हजारे यांच्यासमवेत संवाद साधला. विद्यार्थ्यांस हा आगळा अनुभव होता. विद्यार्थिनींना प्रमाणपत्र व कार्यकर्तापदक देऊन गौरविण्यात आले.

विद्यार्थ्यांनी या संसदेत सहभागी होण्याचे श्रेय प्राचार्या मा. डॉ. शकुंतला ए. सिंह व स्टुडन्टस् फोरम प्रमुख सौ. प्रज्ञा राजेबहादूर यांना दिले.

### संस्कृत विभाग

संस्कृत विभागातील विद्यार्थ्यांनी रामनारायण रूइया महाविद्यालय आयोजित रामायण महोत्सवात सहभाग घेतला.

सोमय्या महाविद्यालयातील संस्कृत संमेलनात विद्यार्थ्यांनी छोटे नाटक सादर केले. तसेच विभागातर्फे कर्नाळा येथे विद्यार्थ्यांची अभ्यासिका सहलदेखील नेण्यात आली.

### हिंदी विभाग

महाविद्यालयाचा हिंदी विभाग आणि हिन्दुस्थानी प्रचार सभा यांच्या संयुक्त विद्यमाने - भाषण प्रतियोगिता 'हम जाति धर्म से परे हटकर भारतीय होने का गौरव महसूस करे' या विषयावर घेण्यात आली. एकूण ५५ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. ज्यात नम्रता दुबे (प्रथम), हिला ३००० रु. रोख बक्षीस, नेहा शर्मा (द्वितीय) हिला २००० रु. रोख बक्षीस आणि अमरीन खान हिला १५०० रु. रोख बक्षीस प्राप्त झाले.

या स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले.

हिंदी विभागातील सर्व विद्यार्थ्यांसाठी 'मीडिया में रोजगार के अवसर' या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. 'मेरी सहेली' या गटाच्या 'होममेकर' मासिकाच्या उपसंपादक पूनम सिंह अतिथी म्हणून लाभल्या होत्या. मुख्य अतिथी व विद्यार्थ्यांमध्ये चर्चात्मक सत्र या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात भरघोस प्रतिसाद दिला.

हिंदी विभागाचे दोन्ही कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांचे मार्गदर्शन लाभले तसेच विभागप्रमुख डॉ. अनिल ढवळे, सहप्राध्यापिका डॉ. जयश्री सिंह यांच्या अथक प्रयत्नाने कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

**पदवीदान सोहळा**

वि.प्र.मं.च्या आवारातील थोरले बाजीराव सभागृहात वि.प्र.मं.च्या सर्व तृतीय वर्षांच्या सर्व शाखेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा पदवीदान सोहळा पार पडला. वि.प्र.मं. प्रमुख डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना पगडी धारण करून प्रमाणपत्र देण्यात आले. वि.प्र.मं.तील सर्व शाखांचे प्राचार्य, सर्व विभागप्रमुख, सर्व उपप्राचार्या या प्रसंगी विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यास उपस्थित होते.

डॉ. विजय बेडेकर यांनी या प्रसंगी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व व त्याचा भविष्यात कसा उपयोग करावा याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

**तिसरा आंतरमहाविद्यालयीन क्रीडामहोत्सव २०१४-१५**

जोशी बेडेकर महाविद्यालयातर्फे दिनांक २ व ३ डिसेंबर २०१४ रोजी तिसरा आंतरमहाविद्यालयीन क्रीडामहोत्सव आयोजित केला होता. या वर्षी या महोत्सवात मुंबई, नवी मुंबई, ठाणे शहर, ठाणे ग्रामीण, पूर्व व पश्चिम उपनगरातल्या एकूण ६२ महाविद्यालयांनी भाग घेतला. फुटबॉल, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो, लंगडी, टेबल टेनिस या खेळांबरोबर या वर्षी बुद्धिबळ, कॅरम, शरीरसौष्ठव व रस्सीखेच या स्पर्धांचा नव्याने या महोत्सवात समावेश करण्यात आला. दिनांक २ डिसेंबर रोजी सकाळी या महोत्सवाचे उद्‌घाटन प्राचार्या डॉ. शकुंतला सिंग व दै. लोकमतचे ठाण्याचे निवासी संपादक नंदकुमार टेणी यांच्या हस्ते करण्यात आला. कबड्डीच्या वाढत्या लोकप्रियतेचा प्रत्यय या महोत्सवात दिसून आला. कबड्डीसाठी एकूण ४६ संघांनी लढत दिली. सदर स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा दि. ३ डिसेंबर रोजी संध्याकाळी ५ वाजता प्राचार्या डॉ. शकुंतला सिंग यांच्या हस्ते पार पडला. गेल्या वर्षी फिरता चषक वडाळयाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाने जिंकला होता. यंदाही या महाविद्यालयाने चुरशीची लढत दिली. पण स्पर्धेच्या एकूण २७ प्रकारांत सर्वाधिक १९ गटांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय अशी विविध प्रकारे बाजी मारत जोशी-बेडेकर महाविद्यालयाने या वर्षी फिरता चषक आपल्याकडे खेचून आणला. स्पर्धेसाठी प्राचार्या डॉ. शकुंतला सिंग यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच वरिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. स्मिता भिडे, उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा. गौरी तिरमारे, समन्वयक प्रा. नारायण बारसे, प्रा. दीपक मुर्डेश्वर तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. शर्मा, प्रा. संगीता दीक्षित यांचे सहकार्य लाभले.

**''वार्षिक क्रीडा स्पर्धा'' २०१४-१५**

जोशी - बेडेकर महाविद्यालयात कनिष्ठ व वरिष्ठ अशा दोन्ही गटातील विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक ४ डिसेंबरपासून या स्पर्धांना सुरुवात झाली. दि. २० डिसेंबर रोजी महाविद्यालयाच वार्षिक क्रीडा दिन साजरा करण्यात

आला. याच दिवशी ॲथलेटिक्स प्रकारातील विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. बुद्धिबळ, कॅरम, टेबल टेनिस या स्पर्धांबरोबरच या वर्षी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंग यांनी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील जास्तीत जास्त खेळाडूंना खेळायची संधी मिळावी व सर्व वर्गातील मुलामुलींना खो-खो, कबड्डी, फुटबॉल, लंगडी, टग ऑफ वॉर (रस्सीखेच) यांसारख्या मैदानी खेळामध्ये सहभागी होता यावे म्हणून महाविद्यालयांतर्गत या सर्व स्पर्धांचे आयोजन करण्यात केले होते. दि. १०, ११ व १२ डिसेंबर रोजी या स्पर्धा उत्साहात पार पडल्या. पहिल्याच वर्षी कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर या स्पर्धेत सहभाग घेतला. दि. १० डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वा. प्राचार्या डॉ. शकुंतला सिंग यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन झाले. स्पर्धेतील विजयी खेळाडूंना वार्षिक क्रीडा दिनाच्या दिवशी म्हणजे दि. २० डिसेंबर रोजी पारितोषिके प्रदान करण्यात आली. दिनांक १८ डिसेंबर रोजी कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील मुलांसाठी सर्वोत्कृष्ट शरीरसौष्ठव ही स्पर्धा आयोजित केली गेली. स्पर्धेला प्रमुख पाहुण्या म्हणून प्राचार्या डॉ. शकुंतला सिंग उपस्थित होत्या स्पर्धेतील विजेत्यांना प्राचार्यांच्या हस्ते पदके व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात अले. महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी क्रीडास्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमधील विजेत्यांनादेखील वार्षिक क्रीडा दिनाच्या कार्यक्रमात पदके व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## विद्या प्रसारक मंडळाचे<br>ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**विद्यापीठ परीक्षा आणि CAP**

१ डिसेंबर ते ९ डिसेंबर दरम्यान LLB SEM I, SEM III, व SEM V च्या विद्यापीठीय परीक्षा घेण्यात आल्या. तसेच सेंट्रल असिसमेंट प्रोग्रामदेखील चालू झाला आहे.

**राष्ट्रीय चर्चासत्र (कलम ३७०) :**

वि.प्र.मं चे जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे ह्यांच्यातर्फे भारतीय संविधानावर आधारित चर्चासत्र दि. ५ डिसेंबर २०१४ रोजी आयोजित करण्यात आले होते. प्राध्यापक श्री. अनिरुद्ध बाबर (Visiting Faculty) ह्यांनी ह्या चर्चासत्रात सहभाग घेतला.

**पी. सी. अलेक्झांडर वक्तृत्व स्पर्धा (११ डिसेंबर)**

मुंबई विद्यापीठातर्फे इंटरकॉलेज वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. श्री. अभिजित सावंत (तृतीय वर्ष विधी), वय ३५ ह्यांनी सदर स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवल्याने त्यांना राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी पुण्यात जाण्याची संधी प्राप्त झाली होती. परंतु विद्यापीठातर्फे कोणत्याही प्रकारची पूर्वकल्पना न देता वयाच्या कारणावरून नामांकन रद्द करण्यात आले.

**तृतीय वर्ष विधी प्रॅक्टिकल ट्रेनिंग**

१७ ते २४ डिसेंबर ह्या दरम्यान ड्राफ्टिंग व म्यूट कोर्ट ह्या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

**स्वच्छता अभियान**

दिनांक २० डिसेंबर २०१४ रोजी वि.प्र.मं.चे विधी, तंत्रनिकेतन व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांतर्फे ठाणे स्टेशन परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. एकूण २० विद्यार्थ्यांनी ह्यामध्ये सहभाग घेतला. ह्या वेळी विधी महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार ह्यांनी विद्यार्थ्यांचे नेतृत्व केले व त्यांना मार्गदर्शन केले. तसेच तंत्रनिकेतन महाविद्यालयातील प्राध्यापिका श्रीमती इंगवले ह्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. मिस शीतल औताडे, ग्रंथपाल, विधी महाविद्यालय व श्री. त्रिभुवन ह्यांनीदेखील ह्या कार्यात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी काही तासांसाठी आपल्या हातातील पेन बाजूला

ठेवत हातात झाडू घेऊन ठाणे स्टेशन परिसर स्वच्छ केला. ह्या वेळी विद्यार्थ्यांनी 'स्वच्छ भारत - माझी जबाबदारी', ही शपथ घेतली व भारतमातेचा जयघोष करित कार्यक्रमाची सांगता केली.

**ॲड. प्रभाकर हेगडे व्याख्यानमाला**

विधी फाउंडेशन, ठाणे व वि.प्र.मं.चे ठामपा विधी महाविद्यालय ह्यांच्या वतीने दि. २१ डिसेंबर रोजी ॲड. प्रभाकर हेगडे व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. ह्या व्याख्यानमालेत ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन प्रशस्तिपत्रके मिळविली.

कार्यक्रमाची सुरुवात ठाणे बार काउंसिल येथील वरिष्ठ वकील व विद्यार्थ्यांच्या संवादाने झाली. ह्या वेळी पॅनेलवर ॲड. सुनीता कापरेकर, ॲड. भाटिया, ॲड. गणेश चव्हाण, ॲड. संदेश पाटील, ॲड. मदन ठाकूर तसेच ॲड. भोसले उपस्थित होते.

विद्यार्थी व पॅनेल सभासदांचा संवाद हा ज्ञानाने व माहितीने परिपूर्ण असा होता. वकिलीची प्रॅक्टिस करताना कोणते गुण अंगी असणे आवश्यक आहे, अडथळ्यांचा सामना करण्यासाठीच्या सूचना, ज्युनिअरशिप व LLB पूर्ण केल्यानंतरच्या व्यवसायाच्या संधी ह्या विषयांवर आधारित विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना मान्यवरांनी अत्यंत संयमाने उत्तरे दिली.

वरिष्ठ वकील ॲड. श्री. श्रीनिवास ओक, श्री. बाबर देसाई व श्री. बाबा चिटणीस ह्यांनी केलेल्या कार्याबद्दल त्यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय जिल्हा व सत्र न्यायालय न्यायाधीश श्री. गांधी ह्यांच्या हस्ते झाले. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना एक उत्तम वकील बनण्यासाठी सतत शिकत राहणे गरजेचे असते ह्याविषयी मार्गदर्शन केले. मुंबई उच्च न्यायालयाचे वरिष्ठ वकील तसेच माजी ॲड. जनरल श्री. विजय थोरात ह्यांनी ''कायदा आणि बदलता समाज'' ह्या विषयावर संभाषण केले तर सन्माननीय न्यायाधीश श्री. अभय ओक ह्यांनी ''न्यायव्यवस्थेत येणाऱ्या समस्या'' ह्या विषयावर संभाषण केले. २०१३-२०१४ चा तृतीय वर्ष विधीचा विद्यार्थी संकेत लेले ह्याला उत्कृष्ट विद्यार्थी पारितोषिक देण्यात आले.

**महिला विकास संघटना**

कामाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणूक (प्रतिबंध, मनाई व निराकरण) अधिनियम, २०१३ कलम ४ च्या अंतर्गत महिला विकास संघटनेची पुनःस्थापना करण्यात आली. सदर कमिटीचे नाव अंतर्गत तक्रार समिती आहे. कमिटीच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार असून प्राध्यापक हेतल व प्रा. मनोज भट्ट (वकील व अर्धवेळ शिक्षक) हे त्या कमिटीचे सदस्य आहेत. तसेच या समितीच्या N.G.O. सदस्य डॉ. श्रीमती स्वाती गाडगीळ (अध्यक्ष, महिला कल्याण संस्था, डोंबिवली) आहेत.

**मानवी अधिकार दिवस**

दि. १० डिसें. २०१४ रोजी मानवी अधिकार दिवस या निमित्ताने विद्या प्रसारक मंडळाच्या टी. एम. सी. विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी शासकीय गौतम विद्यालय, ठाणे येथे जाऊन मानवी अधिकाराबद्दल कायदा साक्षरता कार्यक्रम केला. या साक्षरता कार्यक्रमात विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी कु. समाधान काशीद, सिद्धान्त नाईक, नीलेश लोखंडे आणि संगीता रोकडे यांच्याकडून प्रत्यक्षात लघुनाटकाच्या द्वारे असलेले मानवी अधिकार दाखविण्यात आले आणि त्यानंतर मानवी अधिकाराबद्दल प्रा. विनोद वाघ सरांकडून भाषणाद्वारे अधिकार सांगण्यात आले. या कार्यक्रमास गौतम विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमास गौतम विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. व्ही. पी. सिंग व शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

नवं काहीतरी शिकण्यासाठी मिळालेला वेळ म्हणजे सुट्टी.

### TRAI चा कार्यक्रम

टेलिकॉम रेग्युलेटरी अॅथॉरिटी ऑफ इंडिया (TRAI) तर्फे दि. १८.१२.२०१४ रोजी ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी काशीनाथ घाणेकर सभागृह, ठाणे येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार व प्राध्यापक ए. ए. दातार हे १० विद्यार्थ्यांसह कार्यक्रमास उपस्थित होते. डॉ. सविचेन के. मॅथ्यू, TRAI चे प्रादेशिक सल्लागार, बंगलोर कार्यालय ह्यांनी भाषण केले. उपभोक्ता प्रतिनिधी, एन.जी.ओ. चे प्रतिनिधी, सेवा देणाऱ्या कंपन्यांचे प्रतिनिधी हे उपस्थित होते. तसेच एम.टी.एन.एल, एअरटेल, वोडाफोन, एअरसेल इ. सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांचे प्रतिनिधीदेखील उपस्थित होते. दक्ष राहून आपले भ्रमणध्वनी (सेलफोन) कसे वापरावेत ह्यावर अतिशय माहितीपूर्ण असा हा कार्यक्रम होता.

विद्या प्रसारक मंडळाचे टि. एम. सी. विधी महाविद्यालयाच्या तिन्ही विधी वर्गांच्या, द्वितीय, चतुर्थ व सहाव्या सत्राच्या शिकवणीस दिनांक २ जानेवारी २०१५ पासून सुरुवात झाली. याच दिवशी तृतीय विधी वर्गाची अभियोग न्यायालयाची प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात आली. तसेच द्वितीय विधी विद्यार्थ्यांनी त्यांची प्रात्यक्षिक कार्यवही सादर केली.

### सायबर गुन्हे विशेष व्याख्यान

महाविद्यालयाच्या वतीने दिनांक ३ जानेवारी २०१५ रोजी अधिवक्ता अॅड. श्री. प्रशांत माळी यांचे ‘‘सायबर गुन्हे’’ या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रथम व द्वितीय विधी विद्यार्थ्यांनी सदर व्याख्यानाचा लाभ घेतला.

### भारतीय विद्यार्थी संसद सत्र

MIT School of Government & BCS Foundation, पुणे यांनी आयोजित केलेल्या भारतीय छात्र संसद या कार्यक्रमामध्ये महाविद्यालयाचे खालील विद्यार्थी सहभागी झाले होते.

१) विनोद अरे - तृतीय वर्ष
२) समाधान काशीद - तृतीय वर्ष
३) अभिजित सावंत - तृतीय वर्ष
४) कृष्णा कामत - तृतीय वर्ष

सदर कार्यक्रम दिनांक १०, ११ व १२ जानेवारी रोजी युनेस्को, Tiss आणि केंद्रीय मंत्राालय युवा कल्याण यांच्या मदतीने पार पडला.

टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स, मुंबई या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये ‘महिलाविरुद्धची हिंसा’ या विषयावर एक संवेदित करणारा कार्यक्रम सादर केला. हा कार्यक्रम दिनांक १० जानेवारी २०१५ रोजी पडला. या वेळेस प्रभारी प्राचार्य श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी भारतीय दंड संहितेचे कलम ३५३-अ, ३५३-ब, ३५३-क आणि ३५३-ड यांवर मार्गदर्शन केले.

यानंतर अधिवकता अॅड. श्री. आय. ए. शेख यांनी कौटुंबिक हिंसाचार कायदा, २००५ या विषयावर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. विनोद वाघ यांनी केले.

### "Women's quest for Equality" राष्ट्रीय चर्चासत्र

वि.प्र.मं. चे जोशी-बेडेकर महाविद्यालयाने दिनांक ९ व १० जानेवारी रोजी women quest for Equality - In India या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले होते.

टी. एम. सी. विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी 'Elimination of sexual harasment and making public places safe for women in India' या विषयावर आपला पेपर सादर केला तर अधिवकता अॅड. श्री. अनिरुद्ध बाबर यांनी 'Dissenting Voices : Cultural - Legal Situation of Women in India' या विषयावर आपला पेपर सादर केला. या वेळेस महाविद्यालयाचे प्रा. श्री. विनोद वाघ, अधिवक्ता अॅड. श्रीमती राजश्री गांधी व ग्रंथपाल शीतल औताडे

यांनीही सदर चर्चासत्रामध्ये सहभाग नोंदविला. अंतिम विधी वर्षाच्या विद्यार्थिनी श्रीमती संगीता रोकडे यांनीही सहभाग नोंदविला.

**नानी पालखीवाला वक्तृत्त्व स्पर्धा**

महाविद्यालयाचे विद्यार्थी अभिजित सावंत (तृतीय वर्ष) यांनी राज्यस्तरीय नानी पालखीवाला वक्तृत्त्व स्पर्धेमध्ये द्वितीय पारितोषिक पटकावले. रुपये ८०००/- व पुस्तक असे बक्षिसाचे स्वरूप होते. सदर स्पर्धेसाठी खालील विषय होते.

१) अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि माध्यमाची भूमिका
२) Judicial Activism is the need of the hour and the hour of the need.

**पक्षकार समुपदेशन स्पर्धा**

के. सी. विधी महाविद्यालय यांनी दिनांक ३१ जानेवारी रोजी आयोजित केलेल्या पक्षकार समुपदेशन स्पर्धेमध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी गौतम जैन (तृतीय वर्ष) आणि गौरी सरकार दांडे (प्रथम वर्ष) यांनी भाग घेतला.

**पी. व्ही. सावंत राष्ट्रीय अभिरूप न्यायालय स्पर्धा**

दिनांक ३० आणि ३१ जानेवारी २०१५ रोजी शंकरराव चव्हाण विधी महाविद्यालय, पुणे यांनी न्यायाधीश पी. व्ही. सावंत राष्ट्रीय अभिरूप न्यायालय स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी कुमारी अर्चना, मानसी चित्रे आणि अंकिता मुखर्जी यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी एकूण ३४ महाविद्यालयांनी भाग घेतला होता.

**M.L.D.C. वकृत्त्व स्पर्धा**

M.L.D.C. ॲल्युमनी यांनी राज्यस्तरीय वक्तृत्त्व स्पर्धेचे आयोजन केले होते. दि. ३१ जानेवारी रोजी झालेल्या या स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी रंजनी क्रिशनन (तृतीय वर्ष) यांनी दुसरे बक्षीस मिळविले. भारतामधील स्त्रीभ्रूणहत्या या विषयावर त्यांनी मत मांडले.

**विधी किरण राष्ट्रीय Law Fest स्पर्धा**

के. सी. विधी महाविद्यालय, मुंबई यांनी राष्ट्रीय स्तरावरील Law fest स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. महाविद्यालयाचे विद्यार्थी अभिजित सावंत (तृतीय वर्ष) व आकाश वारंग (द्वितीय वर्ष) आणि मनीष काळे (द्वितीय वर्ष) यांनी यामध्ये भाग घेतला व खालील बक्षिसे मिळविली.

**अभिरूप न्यायालय स्पर्धा - विजेते**

Best Mooter Prize - आकाश वारंग (द्वितीय वर्ष)
Parliamentary Debate - विजेते
Letter to the Cheif Justice Competition - विजेते

**गंधर्व स्पर्धा २०१५**

व्ही. पी. एम. चे जोशी-बेडेकर महाविद्यालय आयोजित Box Cricket स्पर्धेमध्ये व्ही.पी.एम.टी.एम.सी. विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम बक्षीस मिळविले. तसेच चंद्रकांत कांबळे (तृतीय वर्ष) या विद्यार्थ्यांने टेबल टेनिसमध्ये दुसरे बक्षीस मिळविले.

**Box Cricket - द्विगवाल्य**

V. N. BRIMS आयोजित द्विगवाल्य Box Cricket या स्पर्धेस महाविद्यालयाने प्रथम बक्षीस मिळविले.

**खेळ आणि सांस्कृतिक समारोह**

महाविद्यालयाने दिनांक १६,१७ व १८ जानेवारी रोजी खेळ आणि दिनांक ३० व ३१ जानेवारी रोजी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

**पदवी वितरण समारंभ**

मुंबई विद्यापीठाच्या आदेशाप्रमाणे विद्या प्रसारक

मंडळाने दिनांक २ फेब्रुवारी रोजी LL.B व B.G.L. या पदव्यांचे वितरण करण्याचे ठरविले आहे.

**संविधान वक्तृत्त्व स्पर्धा**

महाविद्यालयाने दिनांक ३१ जानेवारी रोजी भारतीय संविधानाच्या विविध विषयांवर वक्तृत्त्व स्पर्धेचे आयोजन केले होते. सदर स्पर्धेसाठी १) राष्ट्रपती २) राज्यपाल ३) सर्वोच्च न्यायालय ४) CAG असे विषय ठेवण्यात आले होते.

मराठी, हिंदी व इंग्रजी अशा तिन्ही भाषांत ही स्पर्धा घेण्यात आली. विजेते खालील प्रमाणे :

१) बलबीर सिंग (प्रथम वर्ष) - प्रथम
२) गौरी हळदवणेकर (प्रथम वर्ष) - द्वितीय
३) अभिजित सावंत (तृतीय वर्ष) - तृतीय
४) विकास कुमार (तृतीय वर्ष) - उत्तेजनार्थ

**प्रजासत्ताक दिन**

दिनांक २६ जानेवारी रोजी व्ही. पी. एम. च्या प्रांगणात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. तसेच ध्वजारोहण व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**प्राचार्यपद**

महाविद्यालयाच्या प्राचार्यपदाची जाहिरात Indian Express व लोकसत्ता, Financial Express आणि जनसत्ता या दैनिकांमध्ये दिनांक ९, १३ व १५ जानेवारी रोजी राष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध करण्यात आली.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांच्या सन २००४ ते २०१४ या कालावधीतला कार्यकाल मुंबई विद्यापीठाकडून मंजूर करण्यात आला. तसे पत्र दिनांक १७ जानेवारी २०१५ ला महाविद्यालयास प्राप्त झाले.

**विधिज्ञ २०१३-२०१४**

महाविद्यालयाचे वार्षिक मॅगझिन विधिज्ञ ५ जानेवारी २०१५ ला प्रिंटिंग करून मिळाले.

**विधी प्रथम सत्र निकाल जाहीर**

दिनांक २८ जानेवारी २०१५ ला विधी प्रथम सत्राचा निकाल मुंबई विद्यापीठाकडून घोषित करण्यात आला. एकूण ३५५ विद्यार्थी या परीक्षेस बसले होते. पैकी ३३.५२% विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यापीठाचा निकाल ३९.१२% एवढा आहे

१) गोर गायत्री विनोद २५५/४००
२) बोडास दीप्ती आनंद २५२/४००
३) चौधरी संध्या साईु २५२/४००
४) खोत निदा बशीर २५२/४००
५) मार्कंड अनुप्रीता शिवदास २४५/४००

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**सिंगापूर औद्योगिक क्षेत्राची शैक्षणिक सहल**
दिनांक १२-१२-२०१४ ते १७-१२-२०१४

डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन संस्थेच्या वतीने एम. एम. एस. पदवीसाठी अभ्यास करणारे विद्यार्थी शैक्षणिक सहलीसाठी सिंगापूरला गेले होते. या सहलीत त्यांनी सिंगापूर व्यवस्थापन विद्यापीठाला भेट दिली. या भेटीत प्राध्यापक मार्क नोविक यांच्याशी त्यांनी चर्चा केली. हे देशामधील खाजगी क्षेत्रातले एक मोठे विद्यापीठ आहे. व्यवस्थापनाशी संबंधित अनेक विषय येथे शिकविले जातात. सर्वत्र फिरून त्यांनी विद्यापीठातील सुविधा दाखविल्या. तेथील विद्यार्थिकेंद्रित अध्यापनपद्धत पाहून विद्यार्थी फारच प्रभावित झाले. त्यांनी प्राध्यापक नोविक यांना ठाण्याला येण्याचे निमंत्रण दिले.

सिंगापूर सहलीतील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे जुरांग बेटावरील औद्योगिक क्षेत्राला भेट. लहानसहान बेटे एकत्र करून या औद्योगिक क्षेत्राची निर्मिती करण्यात आली आहे. येथे प्रामुख्याने रसायन उद्योग आहे. त्या अनुषंगाने सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. या परिसरात प्रवेश करण्यासाठी पूर्वपरवानगी घ्यावी लागते. सर्व सोपस्कार पार पाडून आम्ही या औद्योगिक क्षेत्रात पोहोचलो. अतिशय पद्धतशीरपणे विकसित केलेली ही वसाहत आहे. या वसाहतीत असलेल्या दोन उद्योगांना आम्ही भेटी दिल्या. त्यांपैकी पहिला कारखाना होता बायोडिझेल बनविणारा. पाम तेल ही त्यांची कच्ची सामग्री. ती जवळपासच्या देशातून मिळवितात. मिथिल अल्कोहोल ब्राझील देशांतून मिळवितात. कारखान्यात तयार होणारे बायोडिझेल आणि ग्लिसरिन यांना बाहेरच्या देशांत मोठी मागणी आहे.

याच बेटावरील दुसरा कारखाना होता चॉकलेट आणि बिस्किट यांमध्ये वापरण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थ निर्मितीचा. सोयाबीनचे तेल काढून झाल्यावर उरलेल्या चोथ्यावर प्रक्रिया करून खाण्यास योग्य असे पदार्थ ते बनवितात. या पदार्थांना खूप मागणी आहे असे तेथील लोकांनी आम्हांला सांगितले. महत्त्वाचे असे की या कारखान्यात टाकाऊ असा एकही पदार्थ तयार होत नाही की प्रदूषण होत नाही.

आम्ही भेट दिलेला तिसरा उद्योग आणखी एका वेगळ्या औद्योगिक क्षेत्रात होता. या उद्योगात तेलविहिरींना लागणारी अवजड यंत्रे बनिवण्यात येतात. ही यंत्रे बनिवण्याचे तंत्र आणि त्यांचा वापर यांसंबंधी तेथील मंडळींनी आम्हांला चांगली माहिती दिली. वरील तिन्ही भेटींत आम्हांला अतिशय महत्त्वाची माहिती मिळाली. कच्चा माल घेण्यापासून ते पक्का माल विक्रीपर्यंत सर्व टप्पे त्यांनी आम्हांला समजावून सांगितले. तीन वेगवेगळ्या उद्योगांसंबंधी प्रत्यक्ष माहिती आम्हांला या भेटीत घेता आली. त्यांचे अर्थशास्त्र व्यवस्थापन, मनुष्यबळ विकास या सगळ्या गोष्टी प्रत्यक्ष पाहता आल्या. यातून झालेले/ मिळालेले ज्ञान / शिक्षण वर्णन करण्यापलीकडचे आहे.

व्यवस्थापन विद्यापीठ आणि कारखाने यांखेरीज सिंगापूर शहरात पाहण्यासारख्या ज्या इतर बाबी आहेत त्यादेखील पाहण्याची संधी आम्हांला मिळाली. सेंटोसा बेटाला दिलेली भेट संस्मरणीय अशीच आहे. त्याचबरोबर समुद्रकिनाऱ्यावर असलेली बाग, सिंहाचा पुतळा, मोठे चक्र, जहाज आकाराची इमारत हे सगळेच अवर्णनीय आहे. हे सर्वच अनेक वर्षे स्मरणात राहील.





**'दिग्वलय २०१५' (वार्षिक आंतर महाविद्यालयीन व्यवस्थापन महोत्सव)**

डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेतर्फे

दिनांक २२-२३ जानेवारी २०१५ या दोन दिवशी 'दिग्वलय २०१५' या आंतर महाविद्यालयीन व्यवस्थापन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. उत्साही वातावरणाने भरलेल्या पाणिनी सभागृहात विविधरंगी सांस्कृतिक कार्यक्रमाने सुरू झालेल्या या महोत्सवाचे उद्घाटन श्री. इंद्रनील देब (Founder and Principal, Mobius Strip Capital Advisor) यांच्या हस्ते झाले.

दर वर्षीप्रमाणे या वर्षीदेखील या महोत्सवात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यांमध्ये चक्रव्यूह, अर्थशास्त्रीय परिषद, भारत एक खोज, कर्तव्य, शेर-ए-बझार, व्यापारनीती, व्यापार ज्ञानम, विज्ञापन - ओ- पंती, भ्रमंती, जननीती, दावत-ए-नृत्य , झूम -ए- कल्चर अशा विविध व्यवस्थापनविषयक, सांस्कृतिक तसेच कॅरम, टेबल टेनिस, क्रिकेट , बुद्धिबळ अशा स्पर्धांचा समावेश होता.

या वर्षी मुंबई आणि उपनगर परिसरातील सुमारे ३० विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी या महोत्सवात सहभागी झाले. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी सर्व स्पर्धांच्या प्राथमिक फेऱ्या, दुसऱ्या दिवशी अंतिम फेऱ्या आणि सांगता समारंभ असे या महोत्सवाचे स्वरूप होते .

सांगता समारंभासाठी श्री. रितेश कुमार सिंग (General Manager and Group Economist, Raymond Ltd.) आणि डॉ. अनिल राजमाने (DGM, United India Insurance) हे मान्यवर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते आणि त्यांनी रोजगार संधी या विषयावर विद्यार्थ्यांना चांगले मार्गदर्शन केले. या सांगता समारंभातही विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले व विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र आणि चषकांचे वितरण करण्यात आले मनसुखानी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (MIM) या महाविद्यालयाने सर्वोत्तम महाविद्यालयाचा (Best College) चषक पटकावला.

'दिग्वलय २०१५' च्या विद्यार्थी समितीचा अध्यक्ष श्रीकांत फरडे यांने केलेल्या आभारप्रदर्शनाने या रंगतदार महोत्सवाची सांगता करण्यात आली.

सुमारे दोन महिने अगोदारच तयारी सुरू करून आयोजक समितीमधील सर्वच विद्यार्थ्यांनी खूप मेहनतीने आणि प्रचंड उत्साहाने 'दिग्वलय २०१५' महोत्सव अत्यंत हर्षोल्हासात साजरा केला. साहा. प्राध्यापिका शोभना पणीकर आणि साहा. प्राध्यापिका डॉ. सना फारुकी यांनी विद्यार्थ्यांना या महोत्सवासाठी मार्गदर्शन केले.






**वार्षिक राष्ट्रीय परिषद २०१५ (National Conference on Trends in Finance ''वित्तीय क्षेत्रातील प्रवाह'' )**

डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेतर्फे दिनांक ०७ फेब्रुवारी २०१५ रोजी Trends in Finance / '' वित्तीय क्षेत्रातील प्रवाह'' या विषयावर आधारित राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले .

परिषदेची सुरुवात संचालक डॉ. अमित प. ओक यांच्या उद्घाटनपर भाषणाने झाली. ''वित्तीय क्षेत्रातील प्रवाह'' या परिषदेच्या विषयाचे महत्त्व विशद करताना; त्यांनी विशेषतः २००८ नंतर वित्तीय क्षेत्रातील कायद्यामध्ये आणि नियमांमध्ये झालेल्या सुधारणा, बदललेल्या आर्थिक संरचना, अल्प पतपुरवठा, अल्प कर्जपुरवठा यांचे वित्तक्षेत्रात निर्माण झालेले महत्त्व, इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा शिरकाव इ. मुद्द्यांना अनुसरून आपले विचार व्यक्त केले तसेच सर्व निमंत्रितांचे स्वागत केले.

विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांना आपल्या ध्येयाकडे गांभीर्याने पाहण्याचा सल्ला दिला व परिषदेच्या विषयाबाबत आपले विचार मांडले. 'प्रवाहात नेहमीच बदल होत असतात, तरुण विद्यार्थिवर्ग हा या बदलांचे साधन / माध्यम असते. भारत हा तरुणांचा देश आहे आणि आपण आता जगाशी एकसंध झालो आहोत,' असेही ते म्हणाले.

परिषदेतील पहिले वक्ते डॉ . गुरुप्रसाद मूर्थी (Director General DR.V.N.BRIMS) यांनी वित्तीय क्षेत्रातील खेळत्या भांडवलाचा सकारात्मकतेकडून नकारात्मकतेकडे होणारा प्रवास, नफा विरुद्ध महसूल यांतील बदलते प्रवाह, व्यवसायातील बदलती मानसिकता, भविष्यातील चलन, या क्षेत्रात येणाऱ्या नवनवीन संकल्पना जसे आभासी वित्त व्यवस्थापक, Bitcoin, बदलते राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र इ. विषयांवर भाष्य केले

त्यानंतर परिषदेचे मुख्य अतिथी श्री. अच्युत गोडबोले (MD, Softexcel Consultancy Services) यांनी Indian Economy -Current Scenario and Ahead या विषयावर बीजभाषण सदर केले. भारतीय अर्थव्यवस्थेची सद्यः स्थिती आणि (Inclusive Growth) सर्वसमावेशक /समतोल विकासाचे महत्त्व या विषयावर आपली मते मांडली

परिषदेतील तिसरे वक्ते श्री मिलिंद सरवटे (Independent Company Director Member, Group Management Center, Wadhawan Global Capital) यांनी औद्योगिक व्यवस्थापनात मूल्यनिर्मितीचे महत्त्व आणि त्यामध्ये वित्त व्यवस्थापनाची भूमिका या विषयावर आपले व्याख्यान सादर केले. व्यवसायात मूल्यनिर्मिती कशी करावी आणि व्यावसायिक मूल्ये कशी टिकवावी, मूल्यांचे व्यावहारिक परिणाम इ. संदर्भात त्यांनी भाष्य केले.

त्यानंतर परिषदेतील पुढील वक्ते श्री. भरत पाठक (Director, Wealth Managers (India) Private Limited) यांनी Emergence of Wealth Management Changing Trends या विषयावर सादरीकरण करून संपत्ती व्यवस्थापनातील विविध संकल्पांची माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.

परिषदेतील पुढील प्रमुख वक्ते श्री. राघव नरसाळे (Managing Director, -ccenture Institute for High Performance) यांनी Where are indian banks heading towards? या विषयावर सादरीकरण करताना बँकिंग क्षेत्रातील समकालीन प्रवाह या संदर्भात खूप चांगले भाष्य केले. त्यांच्या मते Integrated banking, Inclusive banking, Internationalised banking and Innovative banking या चार महत्त्वाच्या संकल्पनांवरच बँकिंग क्षेत्राचे भवितव्य आणि विकास अवलंबून आहे.

त्यानंतर श्री. नित्यानंद भंगाळे (Executive Director-Global Markets Business Services, Nomura Services India Private Ltd) यांनी Trends in Global Capital markets या विषयावर आपले व्याख्यान सादर केले व २००८ सालाच्या आधी आणि नंतर भांडवली बाजारातील बदललेले प्रवाह, ROE मध्ये

झालेली घट, YUC- चे नवे वातावरण इ. मुद्द्यांवर चर्चा केली.

तर श्री. किशोर प्रधान (CEO, Global Trade Consultancy Services) यांनी Challenges in Working Capital Financing या विषयावर आपले व्याख्यान सदर केले

तसेच परिषदेतील शेवटचे वक्ते श्री. पुष्कर परुळेकर यांनी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे प्रसिद्ध झालेल्या २०० विविध औद्योगिक संस्थांच्या ४० वर्षांच्या माहितीचा अभ्यास करून तयार केलेल्या विश्लेषणाचे प्रभावीपणे सादरीकरण केले. साहा. प्राध्यापिका स्मिता जपे यांनी आभारप्रदर्शन केले आणि परिषदेचा सांगता करण्यात आली.







**डॉ. व्ही .एन. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्थेचा विद्यार्थी केतन इंदुलकर याचे यश**

आमच्या महाविद्यालयातील MMS या अभ्यासक्रमाचा विद्यार्थी श्री. केतन इंदुलकर याने अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथे ३ जानेवारी २०१५ ते २६ जानेवारी २०१५ या कालावधीत घेण्यात आलेल्या बॉल बॅडमिंटन स्पर्धेत सहभागी होऊन रौप्यपदक पटकावले व त्याची मुंबई विद्यापीठातर्फे चेन्नई येथे होणाऱ्या राष्ट्रीय आंतरविद्यापीठ क्रीडास्पर्धासाठी Ball Badminton संघाच्या कप्तानपदी नेमणूक झाली. या आधीदेखील Ball Badminton मुंबई संघाचा प्रशिक्षक म्हणून नेमणूक झाल्यानंतर त्याच्या संघाने राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेमध्ये कांस्यपदक पटकाविले होते. ६० व्या महाराष्ट्र राज्यस्तरीय कनिष्ठ बॉल बॅडमिंटन स्पर्धेचा संयोजक सचिव म्हणूनदेखील त्याने काम पाहिले आहे. तसेच मुंबई विद्यापीठाच्या Ball Badminton महिला संघाचा व्यवस्थापक म्हणूनदेखील त्याची नेमणूक करण्यात आली आहे.



●●●

(पृष्ठ २ वरून - **संपादकीय**)

मिळणे बाकी आहे.

राष्ट्राच्या किंवा व्यक्तीच्या 'व्यक्तिमत्त्व' विकासातील शिक्षणाच्या योगदानाबद्दल जगात दुमत नाही. भारत हे एक लोकशाही राष्ट्र आहे आणि लोकशाही म्हणजे लोकांनी, लोकांकरता चालविलेले राज्य. लोकसभा किंवा विधानसभेमध्ये आपण कायदे पारित करतो. या सभागृहांतले प्रतिनिधी आपण निवडणुकीने निवडून देतो. तेव्हा या लोकप्रतिनिधींना कमीत कमी 'शैक्षणिक पात्रता' आणि 'चारित्र्य' असणे हे अपरिहार्य होऊन बसते. यातल्या चारित्र्याबद्दल म्हणाल तर परिस्थिती भयावह आहे. २०१४ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत आपण ५४१ लोकप्रतिनीधी निवडून दिले. निवडणूक आयोगाच्या माहितीप्रमाणे यांतील १८६ म्हणजे ३४% प्रतिनिधींना गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे. यांतले राजकीय गुन्हे सोडले तरी ११२ जणांवर खून, अपहरण किंवा स्त्रियांच्या बाबतीत केलेला अव्यवहार असे गुन्हे दाखल आहेत. यांमध्ये सगळ्याच पक्षांचे प्रतिनिधी सामील आहेत. म्हणजे १०० कोटींच्या या देशामध्ये या राजकीय पक्षांना, कुठलीच गुन्हेगारी पार्श्वभूमी नसलेले प्रतिनिधी मिळत नाहीत!! सर्वांत आश्चर्याची बाब म्हणजे गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या लोकसभा सदस्यांमध्ये महाराष्ट्रातील सर्वांत अधिक म्हणजे ३१ प्रतिनिधींवर गुन्हेगारी खटले प्रलंबित आहेत.

शिक्षणाच्या बाबतीतही परिस्थिती तितकीच गंभीर आहे. सुमारे २५% लोकसभेचे प्रतिनिधी हे जेमतेम शालेय शिक्षण घेतलेले आहेत. यामध्ये तेलगू देसमच्या संपूर्ण निरक्षर सभासदाचाही समावेश आहे. या लोकसभा आणि राज्यसभेतूनच मंत्रिमंडळ बनते. आपल्या दैनंदिन जीवनातल्या सर्व अंगांना स्पर्श करणारे निर्णय हे प्रतिनिधी घेत असतात. एखाद्याला दोन-तीन 'स्वरयंत्रे' आहेत की काय एवढा आवाज आणि अभिनवेश करीत; गरीब, शेतकरी, कष्टकरी, मजूर, मागासलेले यांच्या हितासाठी रात्रंदिवस आरडाओरड करणाऱ्या या प्रतिनिधींची आर्थिक परिस्थितीही तेवढीच 'रंजक' आहे. ५४१ लोकसभेच्या प्रतिनिधींमध्ये ४४२ 'लक्षाधीश' आणि कित्येक जण तर 'कोट्यधीश' आहेत. त्यांना आणि त्यांच्या पक्षांना गरिबांबद्दल विशेष 'कणव' असणे नैसर्गिकच आहे. लोकसभा, विधानसभेपासून टोलनाक्यांपर्यंत यांची 'कायदेभंगाची' चळवळ तर सहनशीलतेच्या पलीकडील व 'उबग' आणणारी आहे.

भारताला १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले. त्याआधी ब्रिटिशांचे साम्राज्य आपल्यावर होते. भारताला स्वातंत्र्य देण्यासंबंधातील चर्चिल यांची वक्तव्ये जगजाहीर आहेत. त्यांच्या नेहमी सांगितल्या जाणाऱ्या...

"Power will go to rascals, rogues, freebooters... A day would come when even air & water will be taxed"

या वाक्यांचा संदर्भ चर्चिल यांच्यावरील कुठल्याही पुस्तकात किंवा भाषणात सापडत नाही. म्हणजे नक्कीच कुणीतरी ती विधाने त्यांच्या नावावर खपविली आहेत. ६ मार्च १९४७ रोजी ब्रिटिश संसदेमध्ये भारतासंबंधी जी चर्चा झाली त्या वेळी चर्चिल यांनी बरेच मोठे भाषण केले होते. त्यांची त्या वेळची निरीक्षणे आजही तेवढीच लागू आहेत.

"Let the House remember this. The Indian political parties and political classes do not represent the Indian masses. It is a delusion to believe that they do. I wish they did. They are not as representative of them as the movemements in Britain represent the sunges and impulses of the British nation."

चर्चिल यांच्या 'भारत स्वातंत्र्य द्यायला लायक नाही' या मताच्या पुष्ट्यर्थ, या भाषणात, महात्मा गांधीनींच २४ मे १९४२ ला दिलेल्या भाषणामधील

खालील पंक्तींचा संदर्भ त्यांनी दिला आहे.

"Leave India in God's hands, in modern parlance to anarchy and that anarchy may lead to internecine warfare for a time, or to unrestricted dacoities. From these a true India will arise in place of the false one we see."

महात्मा गांधी हेसुद्धा द्रष्टेच होते आणि स्वातंत्र्यपूर्व भारताचे त्या वेळचे राजकीय नेतृत्व कुठला भारत निर्माण करणार आहे याची त्यांना संपूर्ण जाण होती असेच म्हणावे लागेल!

भारतातील स्वातंत्र्यपूर्व काळातले आणखीन एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व म्हणजे चक्रवर्ती राजगोपालाचारी. यांना नंतर भारतरत्नही देण्यात आले. भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये त्यांचे योगदान मोठे होते. १९२१ साली ब्रिटिशांनी त्यांना वेल्लोर तुरुंगात ठेवून दिले होते. 'सुराज्या'करता स्वातंत्र्य आवश्यक आहे हे त्यांना माहीत होते. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचाच ते एक भाग असल्यामुळे तत्कालीन राजकीय नेते काय 'चारित्र्या'चा भारत बनवू शकतील, याबद्दल त्यांची कारागृहातील रोजनिशीमधील नोंद बोलकी आहे.

"We all ought to know that Swaraj will not at once or, I think, even for a long time to come, be better government or greater happiness for the people. Elections and their corruptions, injustice and the power and tyranny of wealth, and inefficiency of administarion, will make a hell of life as soon as freedom is given to us. Men will look regretfully back to the old regime of comparative justice and efficient, peaceful, more or less honest administration. The only thing gained will be that as a race we will be saved from dishonour and subordination."

आश्चर्याची बाब म्हणजे 'स्वातंत्र्या' नंतरचा 'लोकशाही' भारत कसा होण्याची शक्यता आहे हे डॉ. राधाकृष्णन यांनीही १४-१५ ऑगस्ट १९४७ च्या रात्री केलेल्या भाषणामध्ये व्यक्त केले आहे.

"Our national faults of character, our domestic depotism, obscurantism, narrow-maindedness, superstitious bigotry."

असे जवळजवळ राजगोपालाचारींसारखेच मत व्यक्त करीत; पुढे डॉ. राधाकृष्णन म्हणतात,

"Our opportunities are great but let me warn you that when power strips ability, we will fall on evil days... From tomorrow morning-from midnight today we can no longer throw the blame on the British. We have to assume the responsibility ourselves for what we do. A free India will be judged by the way in which it will serve the interests of the common man in the matter of food, clothing, shelter and the social services. Unless we destroy corruption in high places, root out every trace of nepotism, love of power, profiteering and black-marketing which have spoiled the good name of this great country in recent times, we will not be able to raise the standards of efficiency in administration..."

राजगोपालाचारी किंवा डॉ. राधाकृष्णन हे आजच्या आपल्या 'भ्रष्ट' चारित्र्याच्या राजकारण्यांवर तर भाष्य करीत नाहीत ना; असे वाटावे एवढी त्यांची मते बोलकी आहेत.

लोकशाहीच्या नावाखाली आपण आणलेली घराणेशाही, आपणच स्वेच्छेने निवडून दिलेले गुंड, धटिंगण आणि गुन्हेगारी पार्श्वभूमीचे लोकप्रतिनिधी, यांतून जगातील शिक्षणच काय, पण 'भाटगिरी', आणि 'लांगूलचालना' शिवाय; कुठल्याच क्षेत्रात आपण जागतिक स्पर्धा करू शकू असे आतातरी दिसत नाही. सध्या आपण 'सणां'च्या माध्यमातून सांस्कृतिक 'अभिरुची' तळागाळापर्यंत पोहोचवीत आहोत. नारी सबलीकरणाकरता आपण तिच्या कडेवरचे मूल दूर करून तिच्या कमरेला 'ढोल' बांधले आहेत. भविष्यात भारत

हा ‘श्रवणयंत्र’ बनवणारा सर्वांत मोठा देश झाला तर आश्चर्य वाटायला नको.

भारतातील अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणाकरता अमेरिकेत जातात. अशाचपैकी एक ‘व्यंकटेश रामकृष्णन’ हे आहेत. २००९ साली त्यांना रसायनशास्त्रातील ‘नोबेल’ पारितोषिक मिळाले. याच महिन्यात जगातील ‘शिक्षण’ आणि ‘विज्ञान’ क्षेत्रातील अत्यंत मानाचे समजले जाणारे इंग्लंड येथील रॉयल सोसायटीचे अध्यक्षपदही त्यांना मिळाले. भारतात मात्र आपण किती ‘मागासलेले’ आहोत हे सांगण्यात प्रत्येक ‘समाज’ मग्न आहे. राजकारणीही त्याला सक्रिय पाठिंबा देत आहेत.

अशा वेळी असे म्हणावेसे वाटते की : Brain 'drain' is better than throwing 'brain' in drain.

**डॉ. विजय बेडेकर**

---

(पृष्ठ क्र. ८ वरून **‘माझ्या स्वप्नातील भारत’**)

निर्माण होईल. रशियाप्रमाणे जिम्नॅशियमसारख्या शाळा निघून शालेय जीवनामध्ये औपचारिक शिक्षणाबरोबरच क्रीडाशिक्षण दिले जाईल. आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धांमधील पदकांचा दुष्काळ संपेल. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून पाकिस्तान आणि चीन ही आपली शेजारी राष्ट्रे आपल्या देशाशी शत्रुत्वाने वागत आलेली आहेत. देशामध्ये दहशतवाद बोकाळलेला आहे. माझ्या स्वप्नातील भारतामध्ये ह्या सर्व गोष्टींना पायबंद बसेल. आपल्या देशाकडे कोणीही वाकड्या नजरेने पाहणार नाही, अशी परिस्थिती असेल. आपला देश कोणावरही आपणहून आक्रमण करणार नाही, परंतु आपला देश अण्वस्त्रसज्ज असल्यामुळे शत्रुराष्ट्रांना धाक असेल. आपल्या देशाची कुरापत काढण्याचे त्यांना धाष्टर्य होणार नाही.

आपल्या ऐतिहासिक वारशाचे किल्ले इ. म्हणावे तसे जतन केले जात नाहीत. पुरातत्त्व खात्याचेदेखील पुरेसे लक्ष नाही. पर्यटक सहली आयोजित करतात; परंतु किल्याच्या भिंतीवर स्वतःची नावे कोरणे, कचरा टाकणे इ. प्रकारे त्यांचे विद्रूपीकरण करतात. दंगल कोणत्याही कारणामुळे होवो, हानी होते ही सार्वजनिक मालमत्तेची. सार्वजनिक मालमत्तेची हानी, म्हणजे पर्यायाने देशाची, पर्यायाने आपली हानी, ह्याची जाणीव कोणालाच नाही. आपल्या देशामध्ये खऱ्या अर्थाने लोकशाही रुजलेली नाही. जातीय भावनेला आवाहन करून मतांचा जोगवा मागितला जातो. पैशाची खैरात करून मते विकत घेतली जातात. आपल्याला घटनेने दिलेल्या मूलभूत आणि इतर हक्कांची जाणीव आहे, परंतु आपल्या कर्तव्यांची जाणीव नाही, अशी परिस्थिती आहे. मातृभाषा, स्वसंस्कृती ह्यांचा बिलकूल अभिमान नाही. इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणाऱ्या शाळा आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये आपल्या पाल्यांना शिक्षणासाठी पाठविणारे पालक ह्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चाललेले आहे. ह्या सर्व गोष्टी खेदजनक आहेत. खंत निर्माण करणाऱ्या आहेत. हे चित्र माझ्या स्वप्नातील भारतामध्ये ‘ट्रान्स्फर सीन’ व्हावा त्याप्रमाणे बदललेले असेल; परंतु केवळ स्वप्न पाहून हे चित्र बदलेल का? जादू तर ह्या जगात अस्तित्वातच नाही. शासनाने आणि भारतीय जनतेने कटिबद्ध होऊन अविरत कष्ट घेतले, देशाचा सर्वांगीण विकास ह्या एकाच ध्येयाने प्रेरित होऊन त्यानुसार पावले उचलली, तरच हे सत्यात उतरणे शक्य आहे.

**श्री. प्र. द. अरदकर**
सेवानिवृत्त मुख्याध्यापक,
श्रीरंग विद्यालय, ठाणे
६०४, डी ३, ऋतुपार्क,
ठाणे (प.) - ४००६०१

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❖ संपर्क ❖

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.